नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १३६ * * अमरावती * बुधवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## शाळांसह न्यायालयांना बॉम्बच्या धमक्या

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :** दिल्लीतील दोन सीआरपीएफ शाळा आणि दोन न्यायालयांना ईमेलद्वारे बॉम्ब धमक्या पाठवण्यात आल्या. द्वारका येथील सीआरपीएफ पब्लिक स्कूल आणि प्रशांत विहारमधील सीआरपीएफ शाळांना तसेच साकेत आणि रोहिणी न्यायालयांना या धमक्या पाठवण्यात आल्या होत्या.

माहिती मिळताच दिल्ली पोलिसांचे पथक, बॉम्ब पथक आणि श्वान पथके घटनास्थळी दाखल झाले आणि तातडीने परिसराची सखोल तपासणी केली. तपासणीत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. सूत्रांच्या मते, धमकीचा ईमेल कथितपणे जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेच्या नावाने पाठवला गेला आहे.

अग्राग्रलेख

# खरीखरी..

## फडणवीसांचे खडे बोल

'हम आह भी भरते है तो हो जाते है बदनाम',
'वो कत्ल भी करते हैं तो चचार्ही नही होता'!

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रत्येक संकटातील संधीचा आपल्या पक्षाकरिता कसा फायदा होईल याची आखणी करत असतात. हीच त्यांची खासियत आहे, एखादी निवडणूक आली रे आली की अनेक आयाराम गयाराम येतात आणि जात असतात. एकत्र कुटुंब असले तरी त्यात तीन भावांच्या तीन तऱ्हा असतात, त्या अगदी वेगवेगळ्या असतात. त्यांच्यामध्ये किरकोळ मतभेद होतच राहतात त्यामुळे त्याला याने पक्षात घेतले काय किंवा याला त्याने पक्षात घेतले काय याला फारसे गंभीरपणे न घेता एकत्र कुटुंब चालवताना घरच्या वरिष्ठाला हेही खरे आणि तेही खरे असे म्हणून दोघांनाही शांत करावे लागते. त्यातल्या त्यात जो कमजोर असतो तो नेहमीच तावात असतो आणि जो मजबूत असतो तो नेहमीच आपल्या डावात असतो. सध्या महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या भारतीय जनता पक्ष, शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी यांचा आपापसात भेंड्यांचा खेळ सुरू आहे. परवाच्या दिवशीच शिंदे सेनेच्या नेत्यांनी भारतीय जनता पक्षाचे काही कार्यकर्ते त्यांचे मतपरिवर्तन झाल्यामुळे आपल्याकडे ओढून घेतले. सिगारेट ओढल्यावर जसा धूर बाहेर निघतो तसाच धुरही निघाला. महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्षासारख्या मोठ्या पक्षातून कोणालाही शिंदेंच्या शिवसेनेत खेचून आणणे तेवढे सोपे नसते पण शिंदे सेनेने ते साध्य करून दाखवले. मग त्याला उत्तर म्हणून भारतीय जनता पक्षानेही काही शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांना पटव-पटव पटवून आपल्या छत्र छायेखाली आणून दाखवले. मुंबईच्या गिरगावामध्ये मॅजेस्टिक नावाचे एक पुस्तकांचे दुकान आहे तिथे एक वटवृक्ष आहे. त्याच्या छायेखाली चांगली विक्री होते असे म्हणतात, खरेखोटे काय असेल ते फक्त मॅजेस्टिक वाल्यांना विचारा. तसेच आता भारतीय जनता पक्षाने केले तर त्यात वावगे काय आहे असे आम्हाला अजिबात म्हणायचे नाही परंतु, आधी त्यांनी केले होते तेव्हा त्यांना हर्षवायू झाला होता आता यांनी केल्यावर मागून वायू निघायला लागला. या वादावादी मध्ये राष्ट्रवादी कुठेच दिसला नाही. कारण ते वेगळ्याच वृक्षाच्या छायेत उभे होते, त्या वृक्षाची सारी पानेच गळालेली होती त्यामुळे वृक्षाखाली असूनही ते उन्हात फडफडत होते. अशीच पाडापाडी, मोडामोडी किंवा तोडाफोडी यासारख्या घडामोडी इतर ठिकाणीही सुरूच आहेत. पण भारतीय जनता पक्षामध्ये जर कोणी आले की त्याची बातमी होते आणि भाजपमधून कोणी गेला तरी त्याची किंमत आपोआपच कमी होते, अशा परिस्थितीमध्ये घरातल्या वरिष्ठाने कितीही प्रयत्न केले तरी सर्वांचे समाधान कधीच होत नाही. अशावेळी भाजप, शिंदे यांची शिवसेना आणि राष्ट्रवादी यांनी एका गोष्टीची आपल्या मनात खात्री करून ठेवली पाहिजे. ती म्हणजे या तीन पक्षांपैकी आपल्यात इकडून तिकडे गेले काय किंवा तिकडून इकडे आले काय याचा फारसा प्रतिष्ठेचा विषय करू नये, हा आमचा फुकाचा सल्ला आहे. तिकडे विरोधी पक्षांमध्ये आज तरी सगळा आनंदीआनंदच आहे आता विविध पक्षांनी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर केलेले आहेत. वार्डावरचेही उमेदवार घोषित झालेले आहेत. नामनिर्देशनांची छाननी सुरू असून या अडचणीच्या परिस्थितीमधून देवेंद्रजी बरोबर मार्ग काढतील. त्याचबरोबर सर्वांना हवे ते वजन देतील आणि विजयाचा मार्ग सुकर करतील. याबद्दल त्यांच्या पक्षातील कोणालाही शंका नाही त्यामुळे त्यांनी हे म्हटले की, उत्तरा दाखल आपण ते म्हणावे असे न करता छोट्या-मोठ्या गोष्टींची दखल न घेता आपले संयुक्त कुटुंब अबाधित ठेवावे. सर्वांनी हाच मंत्र अंगिकारावा, यातच शहाणपणा आहे.

[signature]
nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## शिंदेसेनेचा मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार

# फडणवीसांनी मंत्र्यांना झापले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** राज्यात सध्या नगरपरिषद व नगरपंचायत निडवणुकीची रणधुमाळी सुरू आहे. त्यात स्थानिक पातळीवर वेगवेगळे राजकीय समीकरणे अस्तित्वात येत आहेत. त्यातच भाजपकडून मित्रपक्षांचे पदाधिकारी पळवण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. त्यावरून सत्ताधारी महायुतीच्या गोटात प्रचंड धुसफूस सुरू झाली आहे.

या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेना प्रचंड नाराज झाली आहे. या नाराजीतूनच शिवसेनेच्या मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीवर कथितपणे बहिष्कार टाकला.

आजच्या प्री-कॅबिनेटला शिवसेनेचे सर्व मंत्री उपस्थित होते. पण त्यानंतर झालेल्या कॅबिनेटला एकनाथ शिंदे वगळता शिवसेनेचा एकही मंत्री पोहोचला नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर या सर्व नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात जाऊन त्यांची भेट घेतली. त्यात त्यांनी भाजपकडून मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्यात येत असल्याच्या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

**शिंदेंपुढेच त्यांच्या मंत्र्यांना झापले**

शिंदे गटाचे मंत्री भेटीस आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळी उभय नेत्यांत काय चर्चा झाली याचा तपशील समोर आला नाही. पण यावेळी मुख्यमंत्र्यांनी शिंदे गटाच्या मंत्र्यांना मित्रपक्षांचे पदाधिकारी पळवण्याच्या मुद्यावरून झापल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

तुम्ही उल्हासनगरमध्ये या प्रकाराची सुरुवात केली. तुम्ही जे केले ते आम्ही चालवून घ्यायचे आणि भाजपने केले तर ते चालणार नाही असे अजिबात चालणार नाही, असे ते म्हणाल्याचे सांगण्यात येत आहे. यापुढे एकमेकांचे नेते, पदाधिकाऱ्यांना प्रवेश देऊ नका. दोन्ही पक्षांनी या प्रकरणी पथ्य पाळावीत. तुम्ही पथ्य पाळणार असाल तर भाजपही पथ्य पाळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी त्यांना सुनावले. हा प्रकार घडला त्यावेळी स्वतः एकनाथ शिंदे हजर होते. त्यामुळे या प्रकाराची आज दिवसभर मंत्रालय परिसरात चर्चा सुरू होती.

### मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्याचा भाजपवर आरोप



### कुणीही नाराज नाही, निवडणुकांमुळे गैरहजर

शिंदे गटाच्या मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकल्याची माहिती समोर आल्याने खळबळ उडाली होती. मात्र, यावर भाजपने तातडीने स्पष्टीकरण देत, कोणताही मंत्री नाराज नसल्याचा दावा केला आहे.



महसूल मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी संवाद साधत 'नाराजी'चे वृत्त फेटाळून लावले. कुणीही मंत्री नाराज नाहीत. एकनाथ शिंदे स्वतः बैठकीला हजर होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

बावनकुळे यांनी अनुपस्थितीचे कारण स्थानिक निवडणुका असल्याचे सांगितले. निवडणुकीच्या अर्जांची छाननी सुरू होती, भाजपचे आठ मंत्री आपापल्या जिल्ह्यात प्रभारी म्हणून उपस्थित असल्याने गैरहजर होते. शिवसेनेचे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्रीसुद्धा आपापल्या भागात होते. त्यामुळे आजच्या बैठकीतील मंत्र्यांची संख्या कमी होती. दुसऱ्या कोणत्या कारणासाठी कुणी अनुपस्थित नव्हते, असे त्यांनी स्पष्ट केले.

## टॉप नक्षली हिडमाचा खात्मा



७६ सीआरपीएफ जवानांच्या हत्येचा मास्टरमाईंड

■ **वृत्तसंस्था, जगदलपूर, दि. १८ :** कुख्यात नक्षलवादी नेता हिडमा मारला गेल्याचे वृत्त आहे. छत्तीसगड सीमेवर सध्या दोन वेगवेगळ्या चकमकी सुरू आहेत. पहिली चकमक छत्तीसगड-आंध्र प्रदेश सीमेवर झाली, ज्यामध्ये सहा नक्षलवादी मारले गेले. या चकमकीत हिडमा मारला गेल्याचेही म्हटले जात आहे आणि त्याचा फोटोही समोर आला आहे. तथापि, अद्याप याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. हिडमाची पत्नी देखील चकमकीत मारली गेली.

सुकमा जिल्ह्यातील एराबोर पोलिस स्टेशन परिसरात दुसरी चकमक सुरू आहे. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी झालेल्या गोळीबारात अनेक नक्षलवादी जखमी झाले. सुरक्षा दलाने अजूनही घटनास्थळी शोध मोहीम सुरू ठेवली आहे.

## आयकॉनिक शहर विकासाचे धोरण मंत्रिमंडळ बैठकीत जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने आज बृहन्मुंबई उपनगरातील २० एकर किंवा त्याहून अधिक क्षेत्रफळावरील म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्यासंबंधीचे धोरण निश्चित केले.

सरकारच्या या निर्णयामुळे मुंबई व उपनगरांत मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सरकारने आजच्या बैठकीत आयकॉनिक शहर विकासासाठी धोरणही जाहीर केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची साप्ताहिक बैठक झाली. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता लागू असल्यामुळे या बैठकीत जनमतावर प्रभाव टाकणारे कोणतेही मोठे निर्णय घेण्यात आले नाही.

केवळ निवडक विभागांचे ६ निवडक विषय या बैठकीद्वारे हातावेगळे करण्यात आले.

सिडकोसह, अन्य प्राधिकरणांना संबंधित संकल्पनांवर आधारित एकात्मिक वसाहती निर्माण करण्याकरिता अधिकार मिळणार असून, निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी होणार आहे.

भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्स्थापनेची प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी नवीन पदांची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता ३३९ पदांची निर्मिती, शिक्षकांची २३२ आणि शिक्षकेतर १०७ पदांना मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध कायद्यातील मानहानीकारक शब्द वगळण्यास मान्यता देण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विधि व न्याय विभागाने केलेल्या शिफारशींनुसार महारोगाने पिडीत, कुष्ठरोगी, कुष्ठालये असे शब्द वगळण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

## रुग्णवाहिकेला आग, ४ जण जिवंत जळाले

■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १८ :** गुजरातमधील अरावली जिल्ह्यात एका चालत्या रुग्णवाहिकेला आग लागली. या अपघातात एक डॉक्टर, एक परिचारिका, एक नवजात बाळ आणि त्याचे वडील ठार झाले. तथापि, रुग्णवाहिका चालक आणि एका नातेवाईकाला वाचवण्यात आले.

मोडासातील रणसैय्याद चौकडीजवळ हा अपघात झाला. ही रुग्णवाहिका अहमदाबादमधील ऑरेंज हॉस्पिटलची होती. लुणावाडा येथील रहिवासी जिग्नेशभाई महेशभाई मोची यांच्या नवजात बाळाला मोडासाच्या रिच हॉस्पिटलमधून अहमदाबादला उपचारासाठी नेले जात असताना हा अपघात झाला.

## सौदी सरकार परत करणार नाही भारतीय नागरिकांचे मृतदेह

■ **वृत्तसंस्था, रियाध, दि. १८ :** सौदी अरेबियाच्या मक्का-मदिना महामार्गावर झालेल्या बस अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ४५ भारतीय नागरिकांचे मृतदेह भारतात परत आणले जाणार नाहीत. सर्व मृतदेह स्थानिक स्मशानभूमीत दफन केले जातील असे सौदी प्रशासनाने भारतीय दूतावासाला स्पष्ट केले आहे.

मक्का-मदीना प्रदेशात मृत्युमुखी पडलेल्या मुस्लिम यात्रेकरूंना दफन करणे ही एक धार्मिक आणि प्रशासकीय परंपरा आहे. गंभीरपणे जळालेले मृतदेह भारतात पाठवणे हे सुरक्षा आणि आरोग्य नियमांच्या विरुद्ध आहे. परिणामी, हे मृतदेह भारतात परत पाठवले जाणार नाहीत.

## ७९ बांगलादेशी नागरिकांना अटक

■ **वृत्तसंस्था कोलकाता, दि. १८ :** भारताच्या विशेष आर्थिक क्षेत्रात बेकायदेशीर मासेमारी केल्याबद्दल भारतीय तटरक्षक दलाने तीन बांगलादेशी मासेमारी नौका जप्त केल्या आहेत. या बोटींवरील एकूण ७९ बांगलादेशी मच्छिमारांनाही ताब्यात घेण्यात आले. आंतरराष्ट्रीय सागरी सीमा रेषेवर ही कारवाई करण्यात आली.

गस्ती पथकाला या परदेशी बोटी भारतीय पाण्यात खोलवर बेकायदेशीरपणे काम करत असल्याचे आढळले. कोणत्याही क्रू सदस्याकडे भारतीय पाण्यात मासेमारी करण्यासाठी आवश्यक परवाने नसल्याचे आढळून आले. या नागरिकांसह ३ बोटीही भारतीय तटरक्षक दलाने जप्त केल्या.

## असीम सरोदे यांना मोठा दिलासा

### सनद रद्द करण्याच्या निर्णयाला बार कौन्सिलची स्थगिती



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** विधिज्ञ असीम सरोदे यांची सनद रद्द करण्याच्या बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाच्या निर्णयाला बार कौन्सिल ऑफ इंडियाने स्थगिती दिली आहे. यामुळे असीम सरोदे यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

प्रस्तुत प्रकरण खरोखरच व्यावसायिक गैरवर्तनुकीचे आहे का? याचा सखोल अभ्यास करूनच योग्य तो निर्णय घ्यायला हवा होता, असे मत बार कौन्सिल ऑफ इंडियाने या प्रकरणी म्हटले आहे.

असीम सरोदे यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल व विधानसभा अध्यक्ष यांच्या संदर्भात आक्षेपार्ह विधान केले होते. त्यामुळे महाराष्ट्र कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाने त्यांची वकिलीची सनद ३ महिन्यांसाठी रद्द केली होती. सरोदे यांनी या निर्णयाला बार कौन्सिल ऑफ इंडियाकडे (बीसीआय) आव्हान दिले होते. त्यांच्या अर्जावर सुनावणी करताना बार कौन्सिल ऑफ इंडियाने महाराष्ट्र कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाच्या निर्णयाला स्थगिती दिली. बीसीआयने या प्रकरणी महाराष्ट्र बार कौन्सिलचे चांगलेच कान टोचल्याची माहिती आहे.

## अनमोल बिश्नोईला भारतात आणणार



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :** गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोई याला अमेरिकेतून भारतात प्रत्यार्पण करण्यात येत आहे. अनमोलवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी आणि पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला यांच्या हत्येचा आरोप आहे. अभिनेता सलमान खानच्या घरी झालेल्या गोळीबाराच्या घटनेतही अनमोलचे नाव समोर आले. महाराष्ट्र सरकारचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी हत्या करण्यात आली. लॉरेन्स टोळीने या हत्येची जबाबदारी स्वीकारली.

सिद्दीकींच्या मृत्यूनंतर अनमोल पळून गेला. पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला आणि बाबा सिद्दीकींच्या हत्येतही त्याचा सहभाग असल्याचे समोर आले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका धोक्यात?


### ओबीसीच्या ५०% आरक्षण मर्यादेवरून सुप्रीम कोर्टाने सरकारला फटकारले; आज पुन्हा सुनावणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेबाबत निर्माण झालेल्या गोंधळामुळे आता परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षण लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे अनेक शहरांमध्ये एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेपलीकडे गेल्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात उपस्थित झाला. या याचिकेवर सुनावणी घेताना न्यायालयाने राज्य सरकारला स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडू नका, अन्यथा आम्ही निवडणुका थांबवू. न्यायालयाच्या या कठोर भूमिकेमुळे २ डिसेंबरला होणाऱ्या नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांवर अनिश्चिततेचे सावट पसरले आहे. या प्रकरणी बुधवारी पुन्हा सुनावणी होणार आहे.

मराठवाड्यातील अनेक पालिकांमध्ये २७ टक्के ओबीसी आरक्षण लागू केल्यानंतर आरक्षणाचा टक्का वाढल्याची बाब याचिकाकर्त्याने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. विकास गवळी यांनी दाखल केलेल्या या याचिकेवर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमला बागची यांच्या खंडपीठाने सुनावणीत संताप व्यक्त केला.

न्यायालयाने स्पष्ट केले की त्यांच्या पूर्वीच्या आदेशातच म्हटले होते की, बांठिया आयोगाच्या आधी जी परिस्थिती होती, त्यानुसारच निवडणूक घ्याव्यात. म्हणजेच, ओबीसी आरक्षण नसतानाचा आराखडा वापरला पाहिजे. परंतु सरकारने या आदेशाचा सोयीचा अर्थ काढून आरक्षण वाढवले, अशी कठोर टिप्पणी न्यायालयाने केली.



# शिवसेना उपनेत्या प्रिती बंड यांची स्टार प्रचारक म्हणून नियुक्ती

महासागर | प्रतिनिधी



**अमरावती,( दि.18 )** – आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांनी आपल्या स्टार प्रचारकांची अधिकृत यादी जाहीर केली असून, उपनेत्या प्रिती संजय बंड यांची स्टार प्रचारक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना मुख्य नेते व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ही घोषणा करण्यात आली.

पक्षाच्या धोरणांची जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे आणि निवडणूक प्रचाराला योग्य दिशा देणे यासाठी स्टार प्रचारकांची निवड करण्यात आली आहे. महिला नेतृत्व मजबूत करण्याच्या उद्देशाने प्रिती संजय बंड यांची निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे. स्थानिक पातळीवरील त्यांचे सामाजिक योगदान आणि शिवसेनेप्रती निष्ठा लक्षात घेऊन त्यांना ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र शिवसेना सचिव संजय भाऊराव मोरे यांनी प्रदान केले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या प्रचार रणनीतीत प्रिती बंड यांचा सक्रीय सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# छाननीतून नगराध्यक्ष पदाचे 31 तर नगसेवक पदाचे 537 अर्ज बाद

## कागदपत्रांच्या त्रुटींनी उमेदवारांची वाढली चिंता



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.18 )** – नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक 2025 साठी दाखल झालेल्या नामांकनपत्रांची छाननी 18 नोव्हेंबरपासून सुरू झाली असून जिल्ह्यातील एकूण चित्र हळूहळू स्पष्ट होत आहे. 12 नगर परिषद व नगर पंचायतीमधील नगराध्यक्ष पदासाठी प्राप्त 127 अर्जांपैकी 31 बाद झाल्याने 96 अर्ज रिंगणात उरले आहे. तर नगरसेवक पदाकरिता प्राप्त 1821 अर्जांपैकी 537 अर्ज बाद झाल्याने 1284 उमेदवार रिंगणात उरले आहे.

काही ठिकाणी सर्व अर्ज वैध ठरले असले तरी अनेक ठिकाणी कागदपत्रांच्या तुटवड्यामुळे मोठ्या प्रमाणात अर्ज बाद झाले. विशेष म्हणजे एबी फॉर्मवर दोन नावे टाकल्याने निर्माण झालेला गोंधळ लक्षवेधी ठरला; मात्र निवडणूक अधिकाऱ्यांनी एबी फॉर्मवरील पहिले नावच ग्राह्य असा निर्णय देत परिस्थिती स्थिर केली. अचलपूर, वरूड, अंजनगाव सुर्जी, धामणगाव रेल्वे, चांदूर बाजार व दर्यापूर या ठिकाणांची वैध-अवैध अर्जांची अंतिम यादी रात्रीपर्यंत उपलब्ध झाली नव्हती. तरीपण प्रारंभिक छाननीतून अवैध अर्जांची संख्या लक्षणीय असल्याचे स्पष्ट होत आहे.

**दर्यापूर**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 7 | सदस्य 139 |
| अवैध | अध्यक्ष 0 | सदस्य 12 |
| वैध | अध्यक्ष 7 | सदस्य 127 |

**नांदगाव खंडेश्वर**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 11 | सदस्य 87 |
| अवैध | अध्यक्ष 0 | सदस्य 9 |
| वैध | अध्यक्ष 11 | सदस्य 78 |

**चिखलदरा**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 5 | सदस्य 59 |
| अवैध | अध्यक्ष 0 | सदस्य 6 |
| वैध | अध्यक्ष 5 | सदस्य 53 |

**मोर्शी**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 13 | सदस्य 182 |
| अवैध | अध्यक्ष 2 | सदस्य 29 |
| वैध | अध्यक्ष 11 | सदस्य 153 |

**अचलपूर**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 22 | सदस्य 374 |
| अवैध | अध्यक्ष 6 | सदस्य 60 |
| वैध | अध्यक्ष 16 | सदस्य 314 |

**धारणी**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 16 | सदस्य 130 |
| अवैध अ | अध्यक्ष 3 | सदस्य 42 |
| वैध | अध्यक्ष 13 | सदस्य 88 |

**चांदूर बाजार**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 10 | सदस्य 116 |
| अवैध | अध्यक्ष 3 | सदस्य 5 |
| वैध | अध्यक्ष 7 | सदस्य 111 |

**वरुड**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 14 | सदस्य 155 |
| अवैध | अध्यक्ष 3 | सदस्य 33 |
| वैध | अध्यक्ष 11 | सदस्य 122 |

**शेंदुरजनाघाट**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 6 | सदस्य 94 |
| अवैध | अध्यक्ष 0 | सदस्य 7 |
| वैध | अध्यक्ष 6 | सदस्य 87 |

**चांदूर रेल्वे**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 6 | सदस्य 109 |
| अवैध | अध्यक्ष 0 | सदस्य 10 |
| वैध | अध्यक्ष 6 | सदस्य 99 |

**धामणगाव रेल्वे**

| | | |
|---|---|---|
| एकूण | अध्यक्ष 3 | सदस्य 57 |
| अवैध | अध्यक्ष 0 | सदस्य 5 |
| वैध | अध्यक्ष 3 | सदस्य 52 |

## खिडकीला गळफास लावून आत्महत्या

**अमरावती :** राजापेठ पोलीस स्टेशन परिसरातील सबनीस प्लॉट येथे एका इसमाने खिडकीचा गळफास लावून आत्महत्या केली. जयेंद्र शिवदास बोरकर (50) असे मृताचे नाव आहे. त्यांचा मृतदेह घरातील खिडकीजवळ आढळून आला असून, त्यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप समजलेले नाही. राजापेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## बैलगाडीतून पडून एका व्यक्तीचा मृत्यू

**अमरावती :** वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टेंबा गावातील रहिवासी शंकर बापुराव जवंजाळ (60) यांचा बैलगाडीतून पडल्यानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला. मद्यधुंद असताना ते घसरून पडले आणि पडले आणि त्यांना गंभीर दुखापत झाली. जिल्हा रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी शंकर जवंजाळ यांना मृत घोषित केले. वलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# घरात घुसून 18.50 लाखांचा ऐवज चोरला

## सूनेसह कुटुंबातील 11 जणांविरुद्ध गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 18 )**– राजापेठ पोलिस स्टेशन परिसरातील दस्तूर नगर रोड स्थित द्वारकानाथ कॉलनीमध्ये सूनसह तिच्या कुटुंबियांनी 18.50 लाख रुपयांचे रोख रक्कम आणि दागिने घेऊन घरातून पलायन केले. या घटनेची तक्रार एका महिलेने राजापेठ पोलिस स्टेशनमध्ये दाखल केली असून, पोलिसांनी सून आणि तिच्या कुटुंबातील 11 जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

महिलेच्या तक्रारीनुसार, तक्रारदार महिलेच्या मुलाचे 23 फेब्रुवारी 2023 रोजी लग्न झाले. लग्नानंतर दोन ते तीन दिवसांनी तिच्या सुनेने वाईट वागण्यास सुरुवात केली. त्यानंतर तिने तिच्या कुटुंबातील सदस्यांना घरी बोलावले. तिच्या कुटुंबीयांनी तिचे समुपदेशन केले. तरीही, सून वाद घालत राहिली आणि तिला खोट्या तक्रारीत अडकवण्याची धमकी देत राहिली. दुसऱ्या दिवशी, सुनेचे कुटुंबीय घरी आले आणि त्यांनी कपाटातून 8 लाख रुपयांचे 165 ग्रॅम सोन्याचे दागिने, 7.5 लाख रुपयांचे 125 ग्रॅम सोन्याचे दागिने, 1 लाख रुपयांचे चांदीचे नाणे आणि 2 लाख रुपयांची रोख रक्कम अशी एकूण 18.5 लाख रुपये रक्कम काढून पळ काढला. त्यानंतर, काही दिवसातच आमच्याबद्दल तक्रार करू नका, आम्ही दागिने परत करत आहोत. असे त्यांनी महिलेला सांगितले. दरम्यान आपल्या मुलाच्या भविष्याबद्दल चिंतेत असलेल्या महिलेने तक्रार दाखल केली नाही. परंतू संबंधित महिलेने दागिने परत केले नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले. तिने राजापेठ पोलिस ठाण्यात फसवणूक आणि चोरीची तक्रार दाखल केली. तथापि, या तक्रारीवर कोणतीही कारवाई न झाल्याने न्यायालयात खटला दाखल करण्यात आला.

## श्री कॉलनीत लाखो रुपयांची चोरी

**अमरावती :** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साई नगर परिसरातील श्री कॉलनीत लाखो रुपयांची घरफोडी झाल्याची घटना सोमवारी उघडकीस आली. प्रेमदास बळीराम मेश्राम (72) हे घराला कुलूप लावून रायपूरला त्यांच्या सुनेला घेण्यासाठी गेले होते. दरम्यान, अज्ञात व्यक्तींनी घरात घुसून 115,000 रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. प्रेमदास यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास बडनेरा पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस करीत आहे.

# काँग्रेसमधील पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर

## एकाच प्रभागात दोघाना ए बी फॉर्म ? | प्रभाग क्र 2 मधील एक अर्ज बाद

महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर ( दि. 18 ) :** एकाच प्रभागात दोघांना एबी फॉर्म देत काँग्रेमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. नगर पालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज छाननीमध्ये प्रभाग क्र 2 मधील काँग्रेसचे अधिकृत उमेदवार असलेल्या देविदास काळे यांच्या फॉर्म रद्द ठरविण्यात आला आहे.



काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवारी यादीत प्रभाग क्र 2 मध्ये येथील प्रतिष्ठित असलेले देविदास काळे यांना उमेदवारी घोषित झाली होती पक्षाने त्यांना ए बी फॉर्म सुद्धा दिला त्यानुसार अर्ज भरण्यात आला, मात्र वेळेवर त्याच प्रभागात दुसऱ्या व्यक्तीला ए बी फॉर्म दिल्याने अधिकृत उमेदवाराचा अर्ज बाद झाला असल्याने या विषयी खमंग चर्चा शहरात उमटत आहे. दर्यापूर पालिकेत एकूण 25 नगरसेवक निवडून द्यायचे असल्याने काँग्रेस पक्षाने सर्व 25 अधिकृत उमेदवारांना ए बी फॉर्मचे वाटप केले, त्यानुसार सर्वांनी अर्ज भरले, मात्र पुन्हा अमरावती येथील वरिष्ठानी आपल्या जवळचा म्हणून नवा ए बी फॉर्म जारी करत पाठबळ दिले. यामुळे पक्षांतर्गत कुरघोडी चव्हाट्यावर आल्याने अधिकृत उमेदवार म्हणून घोषित झालेल्या उमेदवाराचा अर्ज बाद झाला आहे. देविदास काळे यांचे वय 75 वर पोहोचले असून ही त्यांच्या जीवनातील शेवटची निवडणूक होती, यावर आता काँग्रेस पक्षातील श्रेष्ठी काय निर्णय घेतात यावर लक्ष लागले आहे.

# नगरपंचायत निवडणूक छाननी पूर्ण

## नगराध्यक्षसाठी सर्व अर्ज वैध, नगरसेवक पदाचे 9 अर्ज अपात्र

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, ( दि. 18 )** नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक 2025 अंतर्गत दाखल झालेल्या नामांकन अर्जांची छाननी प्रक्रिया शुक्रवारी पूर्ण झाली. नगराध्यक्ष पदासाठी एकूण 11 अर्ज दाखल झाले होते. विशेष म्हणजे सर्व 11 अर्ज वैध ठरले असून एकही अर्ज बाद झालेला नाही. त्यामुळे या पदासाठीची लढत अधिक चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.




नगरसेवक पदासाठी एकूण 87 अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी 78 अर्जांना वैधता मिळाली असून 9 अर्ज विविध कारणांमुळे अपात्र ठरविण्यात आले. अपात्र ठरलेल्या उमेदवारांमध्ये लायबर अरुण श्रीराम, झीमटे योगेश अशोकराव, राठी रेवती योगेश, कल्पना शुभम खंडार, परसनकर ज्योती विष्णु, राऊत वैष्णवी अविनाश, ज्ञानेश्वर गजानन देशमुख, अंबाडकर दिनेश भारतराव आणि सोनोने मनीषा जयेंद्र यांचा समावेश आहे. छाननीनंतर निवडणूक प्रक्रियेतील पुढील टप्प्याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, उमेदवारांच्या माघारी, अंतिम यादी आणि प्रचार मोहीम यामुळे नांदगाव खंडेश्वरची राजकीय हवा आगामी दिवसात आणखी तापणार आहे.

# मेळघाटातील वाढत्या बालमृत्यूंवरून कारवाईची मागणी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 18 )** – मेळघाट परिसरात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या बालमृत्यूंच्या मालिकेने संपूर्ण राज्यव्यवस्थेला धक्का बसला आहे. कुपोषणामुळे मागील पाच महिन्यांत तब्बल 65 बालकांचे मृत्यू झाले असून, या घटनांची स्वत: उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेऊन शासनावर तीव्र टीका केली आहे. यानंतरदेखील परिस्थितीत सुधारणा न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे.



धारणी उपकेंद्रात काल पुन्हा चार बालकांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. आरोग्य यंत्रणेतील ढिसाळ कारभार, निष्क्रीय कर्मचारी आणि दुर्लक्षित आरोग्य सेवा या कारणांमुळे दुर्गम भागातील बालकांचे जीव जात असल्याची टीका होत आहे. केंद्र व राज्य शासनाकडून कुपोषणनिर्मूलनासाठी कोट्यवधी रुपयांच्या योजना राबवल्या जात असल्या तरी त्या प्रत्यक्षात कागदोपत्री राहिल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर समाजकार्यकर्ते समीर जवंजाळ यांनी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन पाठवून अमरावती जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, तसेच जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी ठाम मागणी केली आहे. मेळघाटातील बालकांचे प्राण वाचवणे ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी असून तातडीने प्रभावी हस्तक्षेप करून वैद्यकीय सेवा सक्षम करण्याची मागणी जवंजाळ यांनी केली आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक संस्थांनीही प्रशासकीय दुर्लक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# नगराध्यक्ष पदासाठी 11 नामांकन अर्ज वैध तर 2 अर्ज अपात्र

## नगरसेवकसाठी 182 नामनिर्देशन पत्रांपैकी 29 नामनिर्देशनपत्रे अवैध

महासागर प्रतिनिधी

**मोर्शी,( दि.18 )**– मोर्शी परिषदेच्या निवडणुकीकरिता दि 10 नोव्हेंबर पासून नामांकन अर्ज दाखल करायला सुरुवात झाली होती. नगराध्यक्ष पदाकरिता एकूण 13 नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आले होते. दिनांक 18 तारखेला नामनिर्देशन अर्जाच्या छाननी दरम्यान यामधील दोन अर्ज अपात्र ठरविण्यात आले असून सध्याच्या घडीला 11 नामांकन अर्ज वैध ठरले आहे.

मोर्शी नप च्या निवडणुकीत भाजपा, काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट,शिवसेना शिंदे गट, बसपा तसेच अपक्ष असे एकूण 10 उमेदवारांनी 11 आवेदनपत्रे सादर केली आहे.

यामध्ये अजमिरे स्मीता प्रदीप अपक्ष, उमाळे रेशमा नितीन भारतीय जनता पार्टी, गुल्हाने प्रतीक्षा रवींद्र शिवसेना शिंदे गट, चिखले वर्षा दिलीपराव अपक्ष, टाकोडे दर्शना आशिषराव अपक्ष,




फरजानबी हैदर शाह बहुजन समाज पार्टी, भडांगे दिपाली विपुल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, महल्ले प्रतिभा निलेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट, रोडे सोनल निलेश अपक्ष 2 अर्ज, वसंत कांचन दिनेश अपक्ष या उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहे.

यापूर्वी 13 उमेदवारांनी नगराध्यक्षासाठी नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते यापैकी रूपाली नितीन राऊत व सुरेखा रवींद्र हिरुळकर हे दोन अर्ज अपात्र ठरविण्यात आलेले आहेत.

## पोस्टर प्रकरणी गुन्हा दाखल

**अमरावती** – गाडगेनगर पोलिस स्टेशन परिसरातील पंचवटी चौकात परवानगीशिवाय पोस्टर लावल्याप्रकरणी इम्रान काझी (42) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. महापालिकेतील कंत्राटी कामगार सुमित बाभूळकर यांनी तक्रार दाखल केली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी 20 वर्षांचा सश्रम कारावास

## अचलपूर जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा,( दि.18 )** – अल्पवयीन मुलीवर अमानुष अत्याचार करणाऱ्या आरोपीस अचलपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयक्र1 चे न्यायाधीश आर. बी. रेहपाडे यांनी 20 वर्षांची सश्रम कारावासाची कठोर शिक्षा तसेच 6,000 रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावत आरोपीस योग्य तो धडा



शिकविला आहे. या निर्णयामुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून न्यायालयाने अशा गंभीर गुन्ह्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे.

12 ऑगस्ट 2022 रोजी पीडित अल्पवयीन मुलगी दळण घेऊन जात असताना आरोपी प्रदीप बाबू कास्देकर (28, धारणी) याने तिला चॉकलेटचे आमिष दाखवून मोटारसायकलवर बसविले आणि गावाबाहेरील जंगलात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. घटनेनंतर धारणी पोलिस ठाण्यात भादंवि कलम 363, 376, 377 तसेच पोक्सो कलम 4 व 6 नुसार गुन्हा नोंदविण्यात आला.

तपास पोलीस उपनिरीक्षक रीना सदार यांनी काटेकोरपणे केला. तर सरकारी पक्षातर्फे ॲड. डी. ए. नवले यांनी 11 साक्षीदार परीक्षेतून आरोपीविरुद्ध ठोस पुरावे सादर केले. न्यायालयाने सर्व पुरावे व साक्षी विश्वसनीय मानत आरोपीचा गुन्हा सिद्ध केला. भादंवि कलम 376 अन्वये 20 वर्षे सश्रम कारावास व 5,000 रुपये दंड, कलम 363 अंतर्गत 3 वर्षे कारावास, 500 रुपये दंड, कलम 377 नुसार 3 वर्षे सश्रम कारावास व 500 रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. सर्व शिक्षा स्वतंत्रपणे भोगावयाच्या आहेत.

# नगराध्यक्षांचे सर्व 7 अर्ज वैध, सदस्य पदासाठीचे 134 अर्ज मंजूर

महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर,( दि.18 )** – दर्यापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 संदर्भात आज झालेल्या नामनिर्देशन पत्रांच्या छाननी प्रक्रियेत महत्त्वपूर्ण निर्णय नोंदवले गेले. छाननीसाठी उमेदवार, त्यांचे समर्थक, विविध पक्षांचे पदाधिकारी आणि निवडणूक विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण प्रक्रिया शांततेत आणि नियमांनुसार पार पडली.



### एकूण आकडेवारी

नगराध्यक्ष पदासाठी 7 वैध अर्ज, सदस्य पदासाठी 127 अर्ज वैध, एकूण वैध अर्ज 134, तर 12 अर्ज अवैध छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे आता प्रचार, अंतिम यादी आणि राजकीय हालचालींना वेग येणार आहे.

### नगराध्यक्षपदासाठी दाखल सर्व 7 अर्ज वैध

नगराध्यक्ष पदासाठी दाखल झालेल्या सर्व 7 अर्जांना छाननी समितीने वैध ठरविले. ज्यामध्ये अदनान फिदा मोहम्मद इकबाल मरछिया, प्रदीप मलीये, अहमद अब्दुल कदिर, मंदाकिनी सुधाकर भारसाकळे, दिपाली नारायण ढोले, नलिनी प्रकाश भारसाकळे, भावना संकेत भुतडा या सातही उमेदवारांनी आता जोरदार प्रचार योजनांना वेग देण्याची तयारी सुरू केली आहे.

### 146 पैकी 134 अर्ज वैध, 12 अर्ज बाद

दर्यापूर नगरपरिषद क्षेत्रातील 12 प्रभागांमध्ये सदस्य पदासाठी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल झाले. एकूण 146 अर्जांपैकी 134 अर्ज वैध ठरविण्यात आले असून 12 अर्ज छाननीत बाद झाले आहेत. बाद झालेल्या अर्जांमध्ये अनिल बोरेकर, भानूदास काठोळे, विठ्ठलराव काळे, मुझफ्फर खा मुक्कद्दर खा, मरछिया अदनान फिदा मोहम्मद, रवाळे शीला प्रमोद, शेख युनूस शेख जहागीर, कडू तूषाल प्रभाकरराव, आशिष केशवराव हिवसे, प्रमोद साखरे, प्रफुल सांगळूदकर(दोन अर्ज) यांचा समावेश आहे.

# अमरावतीचा 'सिटी बर्ड' निवडण्याची प्रक्रिया सुरू!

## नागरिकांना ऑनलाईन मतदानाचा हक्क

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.18 )** – अमरावती शहराच्या पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी महापालिकेने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. 'माझी वसुंधरा अभियान 6.0' अंतर्गत शहराचा अधिकृत 'सिटी बर्ड' निवडण्याची प्रक्रिया आजपासून सुरू झाली असून, अमरावतीकरांना ऑनलाईन मतदानाद्वारे आपल्या आवडत्या पक्ष्याची निवड करण्याचे आवाहन आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.




38 वी महाराष्ट्र पक्षीप्रेमी परिषद आणि तिसरे अखिल भारतीय पक्षिमित्र संमेलन अलीकडेच अमरावतीत पार पडले. या पार्श्वभूमीवर शहराच्या पर्यावरणाशी सुसंगत असा एक 'प्रतिनिधी पक्षी' निश्चित करण्याचा उपक्रम आता प्रत्यक्षात येत आहे. 'सिटी बर्ड' निवडीद्वारे अमरावती आपल्या पर्यावरणपूरक प्रतिमेला नवे रूप देणार असून, नागरिकांच्या सहभागातून हा उपक्रम अधिक प्रभावी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## अमरावतीच्या 'सिटी बर्ड' ची शर्यत — सहा पक्षी उमेदवार जाहीर

महापालिकेने 'वाइल्डलाईफ एन्व्हायर्नमेंट कन्झर्वेशन सोसायटीच्या सहकार्याने अमरावतीच्या जैवविविधतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सहा पक्ष्यांची निवड केली आहे. यामध्ये राखी धनेश = मोठ्या झाडांवर आढळणारा, फळांद्वारे बीजप्रसार करणारा जंगलाचा शेतकरी. तांबट उक्क-उक्क आवाजासाठी प्रसिद्ध; लहान, रंगीबेरंगी आणि सर्वत्र दिसणारा पक्षी. हुदहुद तुरा असलेला डौलदार पक्षी; मोकळ्या जागांवर सहज पाहायला मिळतो. ठीपकेवाला पिंगळा ञ्चरटे झाडांच्या पोकळीत; उंदीर खातो म्हणून शेतीसाठी उपयुक्त. शिक्रा = चपळ शिकारी पक्षी; शहरातही नियमित दिसतो. भारव्दाज = लांब शेपूट, लाल डोळे; हिरवळीत नेहमी दिसणारा शांत स्वभावाचा पक्षी. मतदान 18 नोव्हेंबर 2025 ते 28 नोव्हेंबर 2025 राहील. निकाल घोषणा= 30 नोव्हेंबर रोजी होणार आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या, शहराचे प्रतिनिधित्व करणारा पक्षी निवडण्याची संधी अमरावतीकरांना प्रथमच मिळत आहे. सर्वांनी उत्साहाने सहभागी होऊन आपल्या आवडीचा 'सिटी बर्ड' निवडावा. महापालिकेच्या संकेतस्थळावर आणि अधिकृत सोशल मीडिया हँडलवर मतदानासाठीची लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# महान पंतप्रधान इंदिरा गांधी

भारताच्या सर्वात सामर्थ्यशाली पंतप्रधान इंदिरा गांधी यांची आज १०८ वि जयंती. इंदिरा गांधींची भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात सामर्थ्यशाली आणि महत्वपुर्ण नेत्यांमध्ये गणना होते.

१९ नोव्हेंबर १९१७ रोजी त्यांचा जन्म झाला. इंदिरा गांधी यांना इंदिरा हे नाव आजी आजोबांकडून मिळाले. पण लहानपणी सर्वजण त्यांना प्रियदर्शनी म्हणून बोलवायचे. आई कमला नेहरु आणि वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून त्यांना देशप्रेमाचे बाळकडू मिळाले.

लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. कारण त्यांचे पूर्ण कुटुंबच स्वातंत्र्य लढ्यात अग्रणी होते. लहानपणापासूनच स्वदेश आणि स्वदेशी याविषयी त्यांच्या मनात प्रेम निर्माण झाले. अगदी लहान असतानाच त्यांनी विदेशी खेळणी व कपड्यांची होळी केली होती. एका पाहुण्यांनी त्यांच्यासाठी विदेशातून आणलेला किंमती फ्रॉक परिधान करण्यास त्यांनी नकार दिला होता.

आजोबा मोतीलाल नेहरू व वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांचे देश स्वातंत्र्य करण्यासाठी चालू असलेले आंदोलने पाहून आपणही या आंदोलनात सहभागी व्हावे असे त्यांना वाटे. वयाच्या अवघ्या १३ वर्षी म्हणजे सण १९३० साली त्यांनी आपल्या सवंगड्यांसह वानरसेना नावाची संघटना स्थापन केली आणि नेत्यांचे संदेश पोहचवण्याचे काम केले. इंग्रजांविरुद्ध मिरवणुका काढल्या, घोषणा दिल्या.

त्यांचे सुरवातीचे शिक्षण अलाहाबाद, पुणे इथे झाले पुढे त्या रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन येथे शिक्षण घेण्यासाठी गेल्या. तिथे त्यांनी शिक्षणासोबत विविध कलाही आत्मसात केल्या. वडील पंडित जवाहरलाल नेहरू स्वातंत्र्याचा आंदोलनात अग्रणी असल्याने बऱ्याच वेळा ते तुरुंगातच असायचे अशा वेळी इंदिरा याच आई कमला नेहरू यांची काळजी घ्यायच्या.



१८ फेब्रुवारी १९३६ रोजी कमला नेहरू यांचे निधन झाले तेंव्हा त्यांना खूप दुःख झाले. या दुःखातून सावरण्यासाठी वडील पंडित नेहरू यांनी त्यांना विदेशात शिकण्यासाठी पाठवले. विदेशातून शिक्षण पूर्ण करुन आल्यावर २६ फेब्रुवारी १९४२ रोजी फिरोज गांधी या उमद्या व देखण्या तरुणाशी त्यांनी विवाह केला.

विवाहानंतर फिरोज गांधी व इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्याचा चळवळीत भाग घेतला. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर त्या संसारात रमल्या. राजीव आणि संजीव या दोन मुलांच्या पालनपोषणातच त्यांचा वेळ जाऊ लागला. पुढे त्या काँग्रेसमध्ये सक्रिय झाल्या. १९५९ साली त्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा बनल्या. यावेळी त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी खूप काम केले.

१९६० साली पती फिरोज गांधी तसेच १९६४ साली वडील पंडित नेहरू यांचे निधन झाले तरी त्या खचल्या नाहीत. कठीण परिस्थितीतही त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. लाल बहादूर शास्त्री यांनी त्यांना मंत्रिमंडळात माहिती प्रसारण आणि नभोवाणी खात्याच्या मंत्रीपदाची जबाबदारी दिली त्यांनी ती लीलया पेलली.

लाल बहादूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर २४ जानेवारी १९६६ रोजी त्या देशाच्या पंतप्रधान बनल्या. त्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली पण त्यावेळी देशाची परिस्थिती खूप बिकट होती. भारत पाकिस्तानचे युद्ध झाले होते.

देशात मोठा दुष्काळ पडला होता. अन्नविषयक मदतीचा पी एल ४८० कराराचे नूतनीकरण करण्यास अमेरिकेने नकार दिला होता. या आर्थिक परिस्थितीतुन मार्ग काढत असतानाच १९६७ सलची निवडणूक आली अनेक राज्यात काँग्रेसला पराभव स्वीकारावा लागला. लोकसभेत काँग्रेसचे संख्याबळ घटले. त्यामुळे पक्षातील सिंडिकेट नेत्यांनी उचल खाल्ली.

पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपल्या इच्छेप्रमाणे कारभार करावा असे त्यांना वाटत होते. त्यामुळे इंदिरा गांधी आणि त्यांच्यात वाद होऊ लागले त्यातूनच काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. जेष्ठांची सिंडिकेट विरुद्ध तरुणांची इंडिकेट असा उभा संघर्ष झाला. काँग्रेसमधील तरुण नेत्यांनी इंदिरा गांधी यांना साथ दिली.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी सिंडिकेटचे उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांचा पराभव करुन व्ही व्ही गिरी यांना राष्ट्रपती बनवले. सिंडिकेटचा दारुण पराभव झाल्याने इंदिरा गांधी सामर्थ्यवान बनल्या. मंत्रिमंडळात त्यांनी बदल केले. उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याकडील अर्थखाते त्यांनी स्वतःकडे घेऊन मोरारजी देसाई यांना बाहेरचा रस्ता दाखवला. त्यानंतर त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले.

१४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, संस्थांनीकांचे तनखे रद्द करणे असे निर्णय घेऊन त्यांनी खळबळ उडवून टाकली त्यांच्या या धाडसी निर्णयाला अनेकांनी विरोध केला पण आपल्या निर्णयापासून त्या तसूभरही मागे हटल्या नाही. १९७१ साली झालेल्या मुदतपूर्व निवडणुका त्यांनी एकहाती जिंकल्या.

या निवडणुकीत त्यांनी गरिबी हटाव ही घोषणा दिली. त्यांची ही घोषणा खुप गाजली. गोरगरिबांनी त्यांना भरभरुन मते दिली. याचवेळी पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान यांच्यात मोठा संघर्ष सुरू झाला. पूर्व पाकिस्तानातून एक कोटी निर्वासित भारतात आले. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर ताण पडला.

पूर्व पाकिस्तानला भारत मदत करीत आहे म्हणून पश्चिम पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने भारताला धमकी देत त्यांचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरात पाठवले पण त्या घाबरल्या नाहीत त्यांनी जनतेला आणि सैनिकांना विश्वास दिला. या विश्वासाच्या जोरावरच भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला आणि बांगलादेश नावाचे नवे राष्ट्र उदयास आणले.

पाकिस्तानचे एक कोटी सैनिक भारताला शरण आले. यावेळी त्यांनी दाखवलेल्या धाडसाची आणि नेतृत्वगुणाची जगाने दखल घेतली. जागतिक राजकारणातील एक सामर्थ्यशाली नेत्या म्हणून त्या उदयास आल्या. देशातही त्यांची लोकप्रियता शिखरास पोहचली.

विरोधी पक्षनेते अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांना दुर्गेची उपमा दिली. १९७५ साली त्यांनी सिक्कीमचे भारतात विलीनीकरण केले तर १९७६ साली अणुस्फोट करुन देशाला अणुऊर्जेत स्वयंपूर्ण बनवले. २६ जून १९७५ रोजी त्यांनी देशावर लादलेली आणीबाणी मात्र लोकांना रुचली नाही, त्यामुळे १९७७ साली झालेल्या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला पण तीन वर्षांने १९८० साली त्या बहुमताने विजयी झाल्या.

१९८४ साली पंजाबमधील पवित्र सुवर्ण मंदिरात खलिस्तानवादी अतिरेकी ठाण मांडून बसले होते. देशाची दुसरी फाळणी करुन स्वतंत्र खलिस्तान देश निर्माण करणे ही त्यांची मागणी होती त्यांचा जर लवकर बिमोड केला नाही तर देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला मोठा धोका आहे हे ओळखून या अतिरेक्यांना सुवर्ण मंदिरातून हुसकावून लावण्यासाठी ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबविण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

हा निर्णय घेऊ नये असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला. या मोहिमेमुळे अतिरेकी त्यांचा जीव घेण्यासही मागे पुढे पाहणार नाहीत असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला पण देशाच्या अखंडतेसाठी त्यांनी हा निर्णय घेतला. सुवर्ण मंदिरात ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबवून अतिरेक्यांना बाहेर काढण्यात आले. अनेक अतिरेक्यांचा खात्मा करण्यात आला. भिंद्रनवाले हा अतिरेकी या कारवाईत मारला गेला.

या मोहिमेने दुखावलेल्या त्यांच्या अंग रक्षकानींच ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्यावर गोळीबार केला त्यात त्यांचा दुःखद अंत झाला. त्यांच्या मृत्यूने भारतातच नव्हे जगात शोककळा पसरली. देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेसाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या इंदिरा गांधी यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली!

## राजकारणातून समाजसेवेचे व्रत साकारणारे
# किशोर गोविंदराव कान्हेरे

छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज आणि महात्मा फुले अशा थोर व्यक्तींच्या विचाराने प्रेरित असलेले किशोर गोविंदराव कान्हेरे यांना लहान पणापासूनच समाजकार्याची आवड होती. संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जाणे आणि समाजाच्या विविध घटकातील लोकांच्या जीवन्नोतीसाठी सतत धडपड करण्याची त्यांची प्रवृत्ती त्यांना राजकारणात घेऊन गेली .



समाजसेवेचे व्रत प्रत्यक्षात साकार करण्याचा मार्ग हा राजकारणातून जातो. महाविद्यालयीन काळात सुरू केलेल्या त्यांच्या समाजकायार्चा आणि राजकारणाचा मार्ग त्यांना सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विविध पदापर्यंत आरूढ करून गेला.

गोविंदराव कान्हेरे व लीला गोविंदराव कान्हेरे यांच्या पोटी २१ नोव्हेंबर १९६४ ला जन्मलेले किशोर कन्हेरे यांनी बीए व पॉलिटेक्निक मधील डिप्लोमा पर्यंत शिक्षण घेतलेले आहे. सध्या अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष पदावर कार्यरत असणारे व आपल्या जीवनात सामाजिक व राजकीय वर्तुळात विविध पदे भूषविणारे किशोर कान्हेरे यांची वाटचाल सी. पी. अँड बेरार महाविद्यालयापासून सुरू होते.

महाविद्यालयात शिक्षण घेत असताना ऑल पॉलीटेक्निक स्टुडन्ट असोसिएशन महाराष्ट्र राज्य व सी.पी.अँड बेरार कॉलेजच्या विद्यार्थी संघटनेचे भूषविलेले अध्यक्षपद त्यांना त्यांच्यातील कार्यकर्तृत्वाला बळ देऊन गेले.

छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानणाऱ्या बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यशैलीने प्रभावित होऊन कान्हेरे यांनी १९८२ मध्ये नागपूर शहराचा उपशहर प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली. पुढे बहुजन समाजातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी छगन भुजबळ साहेब यांचे नेतृत्वात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या विदर्भ विभागीय अध्यक्ष या पदावर काम करीत असतांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश कार्यकारणीच्या सचिव पदावर कार्य करण्याची संधी त्यांना मिळाली.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेवुन ओबीसी, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी व ते सोडविण्यासाठी २००६ मध्ये नागपूरला कस्तुरचंद पार्क येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या भव्य मेळाव्याचे आयोजन केले. या मेळाव्याचे स्वागताध्यक्ष पद भुषविण्याची संधी त्यांना मिळाली.

या मेळाव्याला संपुर्ण महाराष्ट्र व विदभार्तुन सुमारे अडीच लाख लोक उपस्थित होते. त्यावेळी संपुर्ण विदर्भातील प्रत्येक जिल्हातील तालुका प्रमाणे ओबीसी समाजाच्या संदर्भात जन जागृती करण्याचे काम बैठक व सभांच्या माध्यमातुन करण्यात आले. बहुजन समाजाच्या विविध मागण्यासाठी जालना, नाशिक, पुणे व दिल्ली येथिल रामलीला मैदानावर हजारोच्या संख्येने विदभार्तुन लोकाची उपस्थिती होती.

ओबीसींची जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे यासाठी भारत देशात कान्हेरे यांनी प्रथम १२ एप्रिल २०१० मध्ये सुप्रीम कोर्टात जनहित याचीका दाखल करून त्या आधारावर सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार लोकसभा व राज्यसभा सभागृहात चर्चा होऊन त्या वेळेसच्या पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी जातीनिहाय जनगणना करण्यास मान्य केले.

ओबीसी जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे त्यासाठी सुप्रिम कोर्टाने १३ सप्टेंबर २०१० ला याचिका निकालात काढली. जातीनिहाय जनगणनेसाठी आदोलणे करण्यात आली. ओबीसी मध्ये जनजागृती करण्यासाठी समता परिषद व विदर्भ माळी समाजाच्या माध्यमातुन नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चद्पुर, वर्धा, अमरावती, मोर्शी, नरखेड, काटोल येथे वेळोवेळी ओबीसी आरक्षणाचे महत्व पटवुन देण्यासाठी मेळावे व सभेचे आयोजन करण्यात आले.

सामाजिक संघटनेच्या माध्यमातुन विविध सामाजिक उपक्रम रक्तदान शिबिर, निशुल्क नेत्र तपासनी शिबिर, स्वास्थ शिबिर, २००८ पासून अंदाजे ५०,००० गरजु विद्यार्थ्यांना निशुल्क संगणक प्रशिक्षण देण्यात आले तसेच सायकल वाटप, महिलाना शिलाई मशिन वाटप, अपंगांना ट्रायसिकल सायकलचे वाटप करण्यात आले.

गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप वेळोवेळी करण्यात येते. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज डॉ.बाबासाहेब आबेडकर याचे विचार जनसामान्यां पर्यंत पोहचविण्याचे काम ते सातत्याने करीत आहे.

सामाजिक व राजकीय पक्षात काम करीत असताना त्यांना विविध शासकीय व अशासकीय पदावर काम करण्याची संधी मिळाली व त्या पदावर कार्य करीत असताना नागरिकांना योग्य न्याय मिळवून देण्याचे काम त्यांनी चोखपणे केले आहे.

१९९३ ते १९९५ म्हाडाचे सभापती असताना गरजूंना स्वतःचे घर मिळवुन दिले. २००२ ते २००५ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संचालक मंडळावर असताना चालक, वाहक व इतर पदावर नविन नियुक्त्या करून होतकरू व तरूण युवकाना रोजगार मिळवुन दिला.

महामंडळाच्या माध्यमातून विविध योजना राबवुन महामंडळाला नफा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. तसेच दुरावस्थेत असलेल्या बस स्थानकांचे नविनीकरण करण्यात आले. २००६ ते २००७ डी.पी.डी.सी नागपूरचे सदस्य असताना या माध्यमातुन जास्तीत जास्त निधी शासनाकडून मिळवून देण्याचे काम केले. महाराष्ट्र शासनाच्यावतिने दिल्या जाणाऱ्या शेतीमधिल भरीव कार्यासाठी उद्यान पंडीत पुरस्काराने २००९ ला त्यांना सन्मानित करण्यात आले.

नागपूर सुधार प्रन्यासचे विश्वस्त म्हणुन काम करीत असतांना नविन नागपूरच्या विकास आराखडा तयार करण्याचे काम केले. त्याच प्रमाणे नागपूर शहरातील उद्याने, प्रमुख चौकांचे व रस्त्यांचे सौंदर्यीकरण, मेट्रोरेल प्रकल्पाला चालना, क्रीडांगणे, इनडोअर स्टेडीयम तसेच नागपुर शहरालगत अमरावती रोड गौडखैरी, वडधामणा, वाडी येथे लॉजीस्टीक हबला चालना देण्यात आली त्यामुळे हजारो बेरोजगार युवकाना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. इतरही महत्वाची कामे व नागपुर महानगर विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून करण्यात आली.

त्यांच्या या सातत्यपूर्ण वाटचालीमध्ये त्यांनी विविध पदे भूषविली आहेत. २०१५ ते २०१९ पर्यंत भारत सरकार भारी उद्योग आणि लोक उदचाम मंत्रालय, भारी उद्योग विभाग नवी दिल्लीचे सदस्यत्व प्राप्त झाले आहे.अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेवर ते सध्या कार्यरत असून, माजी विदर्भ विभागीय अध्यक्ष व चिटणीस महाराष्ट्र प्रदेश, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विदर्भ शाखा, उपाध्यक्ष, कृषी विकास प्रतिष्ठान नागपूरचे सदस्य, महात्मा फुले सामाजिक शिक्षण संस्था नवी दिल्लीचे उपाध्यक्ष, कन्हेरे फाउडेशन अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहेत.

याशिवाय राजकीय कारकिर्दीत त्यांनी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस प्रदेश सचिव, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सचिव तसेच शिवसेना संपर्क प्रमुख जिल्हा-गडचिरोली,सहसंपर्क प्रमुख जिल्हा नागपूर, प्रवक्ता महाराष्ट्र अशी पदे भूषविली असून सध्या ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटी उपाध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. या त्यांच्या वाटचालीत त्यांच्या पत्नी प्रतिभा कान्हेरे आणि मुलगा अंकित कान्हेरे यांनी अमूल्य अशी साथ दिली आहे. सामान्यांचे आयुष्य उज्वलित करण्याच्या त्यांच्या ध्येयवेड्या स्वभावामुळे ते जनमानसांमध्ये लोकप्रिय नेते म्हणून ख्यातीप्राप्त झालेले आहेत.

२१ नोव्हेंबर रोजी वयाची ६१ वर्षे ते पूर्ण करीत असून, यानिमित्त वनामती सभागृहात त्यांचा भव्य सत्कार होतो आहे. किशोरभाऊ कन्हेरे यांच्या यशस्वी वाटचालीकरिता भरभरून शुभेच्छा...

■ ■ ■

## प्राथमिक शिक्षणात नागरिकशास्त्राचा
# समावेश असावा!

नागरिकशास्त्र हे अत्यंत महत्वाचे शास्त्र आहे. प्रत्येक मुलं हे पुढे चालून देशाचा नागरिक बनणार आहे. त्यांना देशाचा एक सुज्ञ नागरिक बनता यावे यासाठी अभ्यासक्रमाची नितांत गरज पडते आहे. याकडे देशातील राज्य कर्त्यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आलेले आहे. यामुळे सुसंस्कारीत, विज्ञानवादी, कर्मयोगी पिढीची निर्मिती होणे दुरापास्त झाले आहे.

जो तो सरकारवर निर्भर होवू पहात आहे. सर्वकाही सरकारच करेल अशी भावना दृढ झालेली आहे. यांस खतपाणी घालण्याचे काम अनेक सरकारांनी, राज्यकर्त्यांनी केलेले आहे. यामुळे निवडणुकीत फुकटच्या योजनांच्या आश्वासनांचा पूर वाहत आहे. यामुळे राज्य सरकारचे बजेट गडबडले आहे. 'आमदणी कम खर्च दुगणा' अशी बिकट परिस्थिती निर्माण झालेली आहे.

मुलांना लहान वयातच चांगल्या सवयी लावता येतात. याचा पगडा आयुष्यभर त्यांच्या मनावर बिंबवला जाऊ शकतो. या वयात मुलें शिक्षकांचा शब्द शिरोधार्य मानतात. ते शिक्षकांसमोर आईवडीलांना पणं जुमानत नाहीत. म्हणून प्राथमिक स्तरांवरील शिक्षकांची जवाबदारी ही वाढलेली असते. त्यांनी आपल्या चांगल्या वर्तणुकीतून मुलांना धडे घालून द्यायचे असतात.


मुलांना आईवडीलांशी कसे वागायचे असते? त्यांचा आदर सन्मान कसा राखला गेला पाहिजे? शिक्षकांशी कसे वर्तन असले पाहिजे? समाजात वावरतांना कसे वागले पाहिजे? सार्वजनिक ठिकाणी कसे वागले पाहिजे? निसर्गातील प्रत्येक गोष्टींकडे कसे पाहिले गेले पाहिजे? निसर्गाचे आपल्या जीवनातील महत्व? विज्ञानाचे आपल्या जीवनात काय स्थान आहे? या प्रमुख गोष्टींचा विविध उदाहरणाव्दारे उलगडा करून दाखविला गेला पाहिजे.

कुंभार जसे मातीचे मडके घडवितो.तसे मुलांना घडविता आले पाहिजे.मुलांमधील गुण हेरून त्यांच्या चांगल्या गुणांना वाव देता आला पाहिजे.वाईट गुणांचा त्याग करता आला पाहिजे.यावरून प्राथमिक शिक्षण हे किती महत्वाचे आहे हे लक्षात येते आहे.

केंद्र व राज्य सरकारे याकडे लक्ष द्यायला तयार नाहीत.

विद्यार्थी संख्या कमी असल्याने अनेक शाळा आज बंद पडत आहेत. मातृभाषेचे महत्व लक्षात न घेतल्याने पालकांमध्ये इंग्रजी भाषेचे आकर्षण हे वाढत चालले आहे. प्राथमिक शाळा हाच शिक्षणाचा खरा पाया आहे. तोच मजबूत नसेल तर देशातील शासन व्यवस्था ही कोलमडून पडणार आहे.

आजची तरूणाई ही आई वडीलांशी, नागरिकांशी, समाजातील लोकांशी नम्रपणे वागतांना आढळून येत नाही.याचे कारण आपणं मुलांना नागरिक शास्त्राचे शिक्षण देतच नाही. जेंव्हा की या देशाचे नागरिक हेच खरे या देशाचे भावी मालक, खरे आधारस्तंभ आहेत. शासनकर्ते आहेत.



**मिलिंद गड्डमवार**
**(मुक्त पत्रकार)**
**राजुरा जि. चंद्रपूर.**
**9511215200**

आपणं लोकशाही व्यवस्थेचा स्विकार केल्याने उलट नागरिक शास्त्राचे महत्व हे वाढलेले आहे. मुलांच्या मनात लहानपणां पासूनच भ्रष्टाचार,चुकीची वागणुक, खोटेपणाची जाणीव याबद्दल चीड निर्माण झाली पाहिजे. खरेपणाबद्दल, चांगल्या वागणुकीबद्दल मुलांच्या मनात आदर निर्माण झाला पाहिजे.

आपले आरोग्य चांगले रहावे यासाठी पोष्टिक अन्न पदार्थ, फळे, ाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ, अंडे-मांसाचे आहारातील महत्व शिक्षणातून समजावून सांगितले गेले पाहिजे. तसेच खेळाचे आपल्या जीवनातील महत्व अधोरेखीत केले गेले पाहिजे.

नागरिकशास्त्र हा चांगल्या राजकीय जीवनाचा पाया आहे. तेच शिकवले जात नसल्याने आज सामाजिक व राजकीय क्षेत्राची अपरिमीतपणे हानी झालेली पहायला मिळते आहे. जनतेशी वागतांना राज्यकर्ते कुठलिही तमा बाळगत नाहीत. मतदानापुरते ते चांगले नाटकं वटवीत असतात. नंतर ते जनतेला आपले गुलाम समजतात. कुठल्याही नियमांचे पालन केले जात नाही.

शिक्षीत लोकांचा मान ठेवला जात नाही. जेष्ठ नागरिकांना सन्मान पुर्वक वागविले जात नाही.निव्वळ कागदोपत्री कायदे अस्तित्वात आहेत.त्याचे पालन केले जात नाही. नागरीक शास्त्रात या सर्वांचा समावेश होत असल्याने ते शिक्षणातून शिकवले गेले पाहिजे.

आज नागरीकांना आपल्या आईवडीलांप्रती, समाजाप्रती, देशाप्रती, शिक्षकांप्रती, देशातील नागरिकांप्रती, आपल्या कामांप्रती आपले काय कर्तव्य आहेत याची जाणीव नाही. याच कारणाने जीवनात शिस्तीचा अभाव आहे. मनमानी पध्दतीने वाटेल तसे वागणे सुरू आहे. यावर कुणाचाही अंकुश नाही.

लोकसंख्येच्या शास्त्राचे पालन केले जात नाही. गर्दीच्या नियमांचे पालन केले जात नाही. जनतेच्या कामांसाठी काही नियम घालून दिलेले असतात. त्याचे पालन केले जात नाही.फक्त जन्मजात हक्काची चांगली जाणीव असते. ती करून द्यावी लागत नाही. परंतु नागरी कर्तव्याच्या नावाने नुसती सगळीकडे बोंब असलेली पहायला मिळते आहे.

जो तो पैश्याच्या लोभाने नागरीकांना छळतो आहे. नागरिकांची खास करून शेतक-यांची,कष्टकऱ्यांची लूट केली जात आहे. याकडे सगळेच दुर्लक्ष करीत असतात.याचे एकमेव कारणं आपणांस नागरीक शास्त्र शिकवलेच जात नाही. त्याचे पालन करणे तर दुरची गोष्ट राहिली.

■ ■ ■

# भ्रष्टाचाराचा कळस

**(कालच्या अंकावरून पुढे)**

---



या प्रकरणात दोषी असणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे ऐवजी क्लीनचीट देण्याची भूमिका घेतली जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. नेता असो वा कुटुंबातील कोणीही व्यक्ती असो कोणताही भेदभाव न ठेवता चौकशी व्हायला हवी आणि दोषीवर कठोरातील कठोर कारवाई झाली पाहिजे, यात जबाबदार असणारे अति उत्साही अधिकारी यांना जबर शिक्षा व्हायलाच हवी, अशी सामाजिक संघटनांची मागणी आहे.

आज सामान्य माणसाला त्यांच्या हक्काचे न्याय मिळत नाही आपल्या वैयक्तिक कामासाठी सरकार दप्तरी अनेकदा चकरा माराव्या लागतात. नागरिकांचे कामे झटपट होत नाही. श्रीमंत माणसाचे कामे मंत्रालयात पैशाच्या जोरावर झटपट होतात. सरकार दरबारी नेत्यांचीच कामे होतात सामान्य माणसाची कामे होत नाही गरिबांची कामे होत नाहीत ही दरी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून वाढत जात आहे.

पार्थ पवार यांचा दिग्विजय पाटील यांचा खास मेहुना आहे आणि म्हणून या जमीन घोटाळ्यांशी पवार कुटुंबियाच्या जवळचा संबंध आहे असे दिसून येते. छत्रपती शिवरायांच्या काळात तसेच ब्रिटिश काळात काही समाजाला त्यांनी बजावलेल्या सेवेच्या बदल्यात उदरनिवार्साठी जमिनीचे काही तुकडे बहाल करण्यात येत होते. छत्रपती शिवरायांच्या काळात तसेच ब्रिटिश काळात काही समाजाला त्यांनी बजावलेल्या सेवेच्या बदल्यात उदरनिवार्साठी जमिनीचे काही तुकडे बहाल करण्यात येत होते.महार वतनाच्या जमिनी, भूदनाच्या जमिनी, चरायच्या जमिनी, महार वतनाच्या जमिनी, भूदनाच्या जमिनी चराईच्या जमिनी राजकारांनी पचवल्या आहेत. जनता नीटपणे सारे सहन करीत आहे भ्रष्टाचारी नेत्यांना राजकारणातून हद्दपार करण्याची वेळ आता आली आहे. नजीकच्या भविष्यकाळात सामान्य माणसांनी ही जबाबदारी उत्तमपणे निभवावी अशी अपेक्षा आहे.

---

■ **नितीन कैलासराव गोहने**
**रा. हिरापूर ता. सावली, जि. चंद्रपूर. 8275393387**

# हिवाळ्यात गूळ आणि चणे खाण्याचे फायदेच फायदे



हिवाळा ऋतू सुरु झाला की शरीराला अधिक ऊर्जा आणि ऊबदारतेची गरज असते. या ऋतूत जास्त गरज असते ती योग्य आहाराची. हिवाळ्यात शरीराला ताकद देणारं एक खाद्य मानलं जातं ते म्हणजे गूळ आणि चणे. गूळ अन् चणे खाणे शक्तीवर्धक असते. ते चवीला चांगले असतेच पण त्यामुळे शरीराला ऊर्जाही मिळते. शरीराला ताकद मिळते.

तज्ज्ञांच्या मते गूळ आणि चणे खाल्ल्यास शरीराला लगेचच ऊर्जा मिळते. शरीरातील ऊर्जा जास्त काळ टिकून राहते. हिवाळ्यामध्ये थकवा आणि आळस अधिक जाणवतो. म्हणून डाएटमध्ये गूळ-चण्याचा समावेश करणे महत्त्वाचे आहे.

**पचनप्रक्रिया सुधारते** : गुळामुळे पाचक एंजाइम्स सक्रीय होतात, चण्यामध्ये फायबर अधिक असतात; ज्यामुळे पोटाचे आरोग्य निरोगी राहण्यास मदत मिळते. बद्धकोष्ठतेच्या समस्येतून सुटका मिळते.

**रोगप्रतिकारकशक्ती मजबूत** : गुळातील आर्यनचे गुणधर्म नव्या रक्तपेशी तयार करण्यास मदत करतात आणि रक्त देखील शुद्ध होते. चण्यामध्ये प्रोटीन आणि खनिजांचे प्रमाण अधिक असते, ज्यामुळे शरीर आतील बाजूनं मजबूत होतं. सर्दी-खोकला यासारख्या समस्यांपासून सुटका मिळते.

**हाडे मजबूत** : थंडीच्या दिवसांत सांधेदुखीची समस्या अनेकांना जाणवते. यावर उपाय म्हणून गूळ-चणे खाणे फायदेशीर ठरू शकते. चण्यामध्ये फॉस्फरस आणि मॅग्नेशिअम तर गुळामध्ये कॅल्शिअम हे गुणधर्म असतात. ज्यामुळे हाडे मजबूत होण्यास मदत मिळते. सांधेदुखी किंवा संधिवात यासारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**त्वचेवर तेज** : गूळ आणि चणे एकत्रित खाल्ल्यास ॲनिमिया म्हणजे रक्ताच्या कमतरतेची समस्या दूर होण्यास मदत मिळेल, हा डाएट विशेषतः महिलांसाठी लाभदायक ठरतो. त्वचेवर नैसर्गिक तेज येते आणि हिवाळ्यामध्ये कोरड्या त्वचेच्या समस्येतून सुटका मिळेल.

**दिवसभरात सेवनाचे प्रमाण**

नियमित २५-३० ग्रॅम भाजलेले चणे आणि १५-२० ग्रॅम गूळ खाणे योग्य आहे.अतिप्रमाणातही गुळ आणि चणे खाऊ नये अन्यथा पोटाचे त्रास होऊ शकतात. तसेच गॅस, पोट फुगणे किंवा वजन वाढणे यांसारख्या समस्या देखील होऊ शकतात. सकाळी किंवा संध्याकाळच्या नाश्त्यामध्ये गूळ-चण्याचा समावेश करू शकता. पण मर्यादित स्वरुपातच गूळ-चणे खाणे योग्य आहे.

■ ■ ■

# लोकशाहीचा चौथा स्तंभ

**वाचक लिहितात**

लोकमान्य टिळकांनी चालू केलेल्या ज्या वृत्तपत्र चळवळीने भारतीयांना पारतंत्र्यातून मुक्त होण्याची प्रेरणा दिली गेली ते तत्व पूर्णतः डावलून वृत्तपत्रांच्या माध्यमातून आता व्यापक बुद्धिभेद चालू आहे. साम्यवादी वृत्तपत्रांच्या लिखाणामध्ये आतंकवादी आणि गुन्हेगार यांच्या कृत्यांमध्ये कमी अधिकतेचा भेद निर्माण करून दोघांनाही एका स्तरावर आणण्याचा प्रयत्नांनात आतंकवाद्याचे सामान्यीकरण करण्याचा प्रकार निदर्शनास येत आहे.

आतंकवादी आणि गुन्हेगार यांच्या कृत्याच्या परिणामांची व्यापकता आणि उद्देश लक्षात घेता आतंकवाद किंवा आतंकवादी यांच्या सामान्यीकरण करण्यासाठीचा प्रयत्न देशासाठी अत्यंत विघातक आहे. असे विघातक विचार वृत्तपत्रातून सामान्य पर्यंत पोहोचविले जाणे म्हणजे सामान्यांच्या नकळत आतंकवाद्यांना पाठीशी घालणे होय. याकडे वेळीच लक्ष न दिल्यास सामान्याच्या बुद्धीचा घात करणारे हे सर्वात विघातक वैचारिक शस्त्र चालू आणि भविष्यातील पिढ्यांची मोठी हानी करत आहे हे निश्चित.

प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात साम्यवाद्यांचा मोठा वावर आहे. गुन्हात आणि दहशत पसरविण्यात साम्यवादी आणि जिहादी आतंकवादी एकमेकांना साथ देताना आढळतात कारण त्यांचा हेतू समान आहे. त्यामुळे आतंकवादी कृत्य करणाऱ्यांचा हेतू सगळ्यांच्या घशात उतरविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

एक नासके फळ सर्व फळांना नासावयाला पुरे असते तसाच एक नासका विचार संपूर्ण समाज नासवायला पुरा आहे हे समजून घेऊन अशी विचार केंद्र आणि कृती केंद्रावर कारवाई करणे अपेक्षित आहे. कथितांच्या कथित कथनाला न भुलता आतंकवादी आणि साम्यवादी यांची अभद्र युती समजून ती एकाच वेळी तोडणे महत्त्वाचे आहे.

आतंकवाद्यांपासून देशाच्या सीमांचे रक्षण आणि साम्यवाद्यांपासून भारतीय समाज मनाचे रक्षण करणे यासाठी प्रत्येक देशप्रेमी पक्ष, राष्ट्रप्रेमी आणि हिंदू धर्म प्रेमी भारतीयाने आपापल्या स्तरावर कार्यरत राहिले पाहिजे.

भारतातील नेतृत्वाने आतंकवादासह भारताला पोखरणारा साम्यवाद या समस्ये कडेही शून्य सहनशीलता बाळगून त्याविरुद्ध पावले उचलणे अपेक्षित आहे.

■ **लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

# अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## कसरत..!

निवडणूकीचे पडघम
आता लागलेत
वाजाया
कार्यकर्त्यांच्या तालावर
उमेदवार लागले
नाचाया . !

आश्वासनांच्या
खैरातीची
आता लागेल शर्यत
अर्थव्यवस्था
मोडीत निघाली
तरी काही नाही हरकत!

# अचलपूरकरांना हवा 'विकासाचा व्हिजन' असणारा लोकसेवक

## उमेदवार निवडून येतात आणि पाच वर्षे गायब होतात ■ शहराच्या विकासाचा ध्यास कुणाचा ?

महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट,** (दि.18)– कोणतीही निवडणूक आली की उमेदवारांकडून मोठमोठी आश्वासने, वचननामे आणि रंगीत जाहीरनामे मतदारांपुढे मांडले जातात. मात्र निवडून आल्यावर पाच वर्षे ते क्वचितच दिसतात, ही कटू वस्तुस्थिती अचलपूरकरांनी अनेकदा अनुभवली आहे. त्यामुळे यावेळी नगरपालिकेच्या निवडणुकीत मतदार एका वेगळ्या दृष्टीने उमेदवारांना पडताळत आहेत.



शहराला खऱ्या अर्थाने विकासाची गरज आहे. परंतु 'विकास' या शब्दाचा जप करणाऱ्यांच्या कामात कोणते ठोस व्हिजन दिसत नाही, अशी नाराजी नागरिकांत व्यक्त होते. शहरातील मूलभूत समस्या, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि वाढता अस्वच्छतेचा प्रश्न — या सर्वांचा विचार करता आतापर्यंतचे लोकप्रतिनिधी अयशस्वी ठरल्याची भावना वाढीस लागली आहे.

अचलपूरचा नवाबकाळातील परकोट, कार्तिकस्वामी मंदिर हे ऐतिहासिक वारसास्थळे शहराची खास ओळख आहेत. पर्यटन क्षेत्रात मोठी प्रगती साधता आली असती; परंतु गेल्या काही वर्षांतील उदासीनतेमुळे शहर इतर तालुक्यांच्या तुलनेत मागे पडले आहे अशी टीका नागरिक करत आहेत.

राजकारणापलीकडे जाऊन समाजकारणाला प्राधान्य देणे, आरोग्य सुविधा सुधारणे, नाल्यांची वेळेवर स्वच्छता करणे आणि शुद्ध पाणीपुरवठा करणे— या मूलभूत कामांमुळेच शहराचा खरा विकास होऊ शकतो, असे अचलपूरकरांचे मत आहे.

### निवडून या; पण गायब होऊ नका

निवडणुकीच्या काळात सर्वच उमेदवार हात जोडून 'आम्हाला संधी द्या' म्हणतात. पण विकासाचे काम सुरू ठेवण्याची जबाबदारी मात्र अनेकजण विसरतात. पाणीपुरवठा नियमित करणे, वीज, स्वच्छता तसेच नागरिकांच्या छोट्या-मोठ्या समस्या सोडवण्याचा निर्धार खऱ्या लोकसेवकाने ठेवणे आवश्यक आहे, अशी जनभावना आहे.

### भावी उमेदवारांकडून मोठ्या अपेक्षा

नव्या नगरसेवकांकडून नागरिकांना मोठ्या अपेक्षा आहेत. 'शहर छोटे — पण व्हिजन मोठे' अशी स्पष्ट मागणी आहे. केवळ रस्ते किंवा दिवे लावणे म्हणजे विकास नव्हे; रोजगार, आरोग्यसेवा, शिक्षण, स्वच्छता आणि पायाभूत सुविधा यांवर लक्ष केंद्रित करणे काळाची गरज आहे.



# चुरणी येथे प्रहार जनशक्ति पक्षाचे कार्यकर्ता संमेलन

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी,** (दि. 18) - चुरणी येथील आदिवासी भवनात प्रहार जनशक्ति पक्षाचे कार्यकर्ता सम्मेलन व आढावा बैठक उत्साहात संपन्न झाली. या बैठकीस प्रहार जनशक्ति पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार बच्चू कडु यांची विशेष उपस्थिती होती. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या बैठकीत पक्षाच्या पुढील धोरणांवर सविस्तर चर्चा झाली.

चिखलदरा तालुका प्रहार जनशक्ति पक्षाचे अध्यक्ष नरेंद्र टाले यांच्या पुढाकाराने या सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संघटन बळकटीकरण, बूथस्तरावरील तयारी, जनसंपर्क मोहिमांची आखणी तसेच स्थानिक प्रश्नांवर प्रहार पक्षाची भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

बच्चू कडु यांनी शेतकरी, आदिवासी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे लढण्यासाठी कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल नरेंद्र टाले यांचे उपस्थितांनी कौतुक केले. या सम्मेलनात शंभरहून अधिक युवक आणि महिलांनी पक्षात प्रवेश केला असून परिसरात या मेळाव्याची व्यापक चर्चा रंगली आहे.

# आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर सातत्याने काम करणार - प्रणित कुबडे

## परिसरात उत्साहात साजरी झाली बिरसा मुंडा जयंती

महासागर | प्रतिनिधी

**वरुड,** (दि.18)– जामगाव, बारगाव, खडका, गोरेगाव आणि बेनोड्या परिसरात आदिवासी संस्कृती, परंपरा आणि स्वाभिमानाचे प्रतीक असलेली बिरसा मुंडा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. 15 नोव्हेंबर रोजी आयोजित या कार्यक्रमांना आदिवासी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आदिवासी ढोल-नृत्य, पारंपरिक वादन, कला-संस्कृतीचे आकर्षक प्रदर्शन आणि बिरसा मुंडा प्रतिमेला अभिवादन अशा उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर उत्साहाने दुमदुमला.



या जयंती निमित्त बिरसा मुंडा यांच्या संघर्षमय जीवनाची, स्वातंर्त्यलढ्यातील योगदानाची आणि आदिवासी समाजाला दिलेल्या स्वाभिमानी मार्गदर्शनाची उजळणी करण्यात आली. त्यांच्या विचारांनी आजही समाजघटकांना प्रेरणा दिल्याचे मत ज्येष्ठांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात युवा नेते प्रणित कुबडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर सातत्याने काम करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. तरुणांना शिक्षण, एकता आणि समाज उन्नतीची दिशा देताना बिरसा मुंडांच्या आदर्शांवर चालावे, असे आवाहन त्यांनी केले. ग्रामीण भागातील विविध गावांनी एकत्र येऊन साजरा केलेला हा उत्सव आदिवासी अस्मितेचा जागर ठरला. शिस्तबद्ध, संस्कृतीप्रधान आणि प्रेरणादायी आयोजनाची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# सिईओ संगीता मोहपात्रा यांची निंभारी जिल्हा परिषद शाळेला भेट

## विद्यार्थ्यांनी आपल्या कलाविष्काराने सर्वांना केले मंत्रमुग्ध

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,** (दि.18)– अंजनगाव सुर्जी तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा निंभारी येथे मुख्य कार्यपालन अधिकारी(सिईओ) संगीता मोहपात्रा यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत निंभारी ग्रामपंचायतला भेट दिली असता स्थानिक जिल्हा परिषद शाळेलाही भेट दिली. त्यांच्या आगमनानिमित्त शाळेच्या लेझीम पथकाने उत्साहात स्वागत केले. स्वागतगीताच्या सुरांनी वातावरण भारावून गेले.



यानंतर विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ निर्मिती या उपक्रमांतर्गत तयार केलेल्या कलाविष्काराचे अवलोकन करण्यासाठी त्यांना आमंत्रित करण्यात आले. या कलाविष्काराचे उद्घाटन मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेने त्या अत्यंत प्रभावित झाल्या. भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला व मुलांच्या कल्पकतेचे मनापासून कौतुक केले. शाळेची एकूण प्रगती, मुख्याध्यापक व शिक्षकांच्या कार्याचे तसेच शिस्तीचेही त्यांनी कौतुक केले. गटशिक्षणाधिकारी सुधीर खोडे यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांच्या कार्यावर सादर केलेल्या कवितेने त्या भारावून गेल्या. प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता व सर्वांगीण विकासाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्लास्टिक हटवा, जमीन वाचवा या पथनाट्यातील बालकलाकारांचेही त्यांनी कौतुक केले. विद्यार्थिनी अमीनाने दिलेले सुंदर कर्णफुले स्वीकारताना त्या भावूक झाल्या. या कार्यक्रमासाठी विज्ञान शिक्षक व प्रभारी विस्तार अधिकारी सुशील अभ्यंकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास गटविकास अधिकारी कल्पना जायभाये, विस्तार अधिकारी रवींद्र दारसिंभे, शीला आठवले, दिलीप खंडारे, उपसरपंच भीमराव खंडारे, ग्रामपंचायत सदस्य, शाळा समिती सदस्य, केंद्रप्रमुख व ग्रामसेविका मंगला सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षा 23 नोव्हेंबरला

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,** (दि.12)– महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) 2025 चे आयोजन करण्यात आले असून ही परीक्षा रविवार, 23 नोव्हेंबर 2025 रोजी होणार आहे. परीक्षेसंबंधी सर्व अधिकृत माहिती परिषदच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध केली जात आहे. अलीकडे युट्युब चॅनेल्स, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स आणि काही माध्यमांद्वारे टेट परीक्षेबाबत अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवल्या जात असल्याचे परिषदच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे उमेदवारांनी अशा अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन परीक्षा परिषदेने केले आहे. उमेदवारांनी परीक्षेसंबंधी सर्व अद्यतने, सूचना आणि माहिती जाणून घेण्यासाठी केवळ [www. mscepune.in] (http://www. mscepune .in) आणि [http://mahatet.in] (http://mahatet.in) या अधिकृत संकेतस्थळांनाच भेट द्यावी.

# मेस्को कार्यालयात माजी सैनिकांसाठी नोकरीची संधी

## लिपिक टंकलेखक पदांसाठी अर्ज सुरू

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,** (दि.18) - संरक्षण दलातून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांसाठी मेस्को (रूध्वस्ष्ट्ह) क्षेत्रीय कार्यालय, अमरावती येथे नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. सैनिकी मुलांचे वसतिगृह, नवसारी, अमरावती येथील क्षेत्रीय कार्यालयाकरिता लिपिक टंकलेखक या पदासाठी एकूण दोन जागा भरण्यात येत आहेत. या पदासाठी निवड झालेल्या उमेदवाराला मासिक ठोक मानधन 30 हजार रुपये इतके दिले जाईल.

उमेदवार हा सशस्त्र सेना दलातील निवृत्त जेसीओ , ओआर आणि त्यांच्या विधवा,परित्यक्ता असावेत. अर्जदाराचे वय 57 वर्षांपेक्षा जास्त नसावे. उमेदवाराकडे मराठी भाषेचे (बोलणे, लिहिणे, वाचणे) ज्ञान असणे आवश्यक आहे. यासोबतच अकाउंटिंग, एम एस - ऑफिस आणि मराठी, इंग्रजी टायपिंगचे मूलभूत ज्ञान असणे अपेक्षित असून, यासंबंधीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. महाराष्ट्रात नेमणुकीसाठी महाराष्ट्र राज्याचे रहिवासी प्रमाणपत्र आवश्यक आहे. कार्यालयीन अधीक्षक, मुख्य लिपिक स्तरावरील लिपिकांना प्राधान्य राहील. तसेच सशस्त्र सेना दलातून लिपिक पदावरून निवृत्त झालेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.शक्यतो मेडिकल कॅटेगरी SHAPE-1 किंवा SHAPE-2 असावी. पात्र उमेदवारांनी आपले अर्ज खालील ई-मेल पत्त्यावर किंवा पोस्टाने पाठवावे. ई-मेल पत्ता- ro-amravati@mescoltd.co.in, कार्यालयीन पत्ता- क्षेत्रिय कार्यालय अमरावती, सेनिकी मुलांचे वसतिगृह, नावसरी अमरावती 444604 हा आहे. इतर अटी व शर्ती लागू राहतील. अधिक माहितीसाठी 07212952040 किंवा मोबाइल क्रमांक 9373164962/ 7495097958 वर संपर्क साधावा.

## विनोदराव मोरे यांना पत्नीशोक

**मोर्शी**– मोर्शी एसटी डेपोतून सेवानिवृत्त झालेले चालक विनोदराव मोरे यांच्या पत्नी शालिनी मोरे यांचे नुकतेच अमरावतीच्या रुग्णालयात दु:खद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय 56 वर्षे होते. त्यांचे पश्चात एक मुलगा, सून, एक मुलगी आणि नातवंडे असा आप्त परिवार आहे. जवाहर स्मृती विद्यालय देलवाडी (ता. आष्टी, जि. वर्धा) येथील कनिष्ठ लिपिक उद्धव मोरे यांच्या त्या मातोश्री होत्या.



# डीएमएक्स ग्रुपच्या सेवा यज्ञाला दहा वर्ष पूर्ण

महासागर | प्रतिनिधी

**हिवरखेड,** (दि.18) - डीएमएक्स ग्रुप महाराष्ट्र राज्य आणि एकनिष्ठ सेवाभावी बहुद्देशीय संस्था या युवकांनी चालवलेल्या सामाजिक संघटनांनी त्यांच्या अविरत सेवेची दहा वर्षांची वाटचाल नुकतीच पूर्ण केली. विद्यालयीन आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सुरू केलेल्या या उपक्रमाने यंदाच्या दिवाळीत कडाक्याच्या थंडीत बेघर, निराश्रीत आणि गरजू वृद्धांच्या जीवनात ऊब निर्माण केली.



संत गाडगे बाबा वृद्धाश्रम वलगाव येथे ह.भ.प. वेदांतपाल महाराज मुंदाने यांच्या कीर्तनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. ह.भ.प. ओम महाराज पाथरे यांनीही मौलिक विचार मांडले. यावेळी अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा स्व. मिथिलेश दारोकर यांच्या स्मरणार्थ वृद्धाश्रमाला देण्यात आली. गेल्या नऊ वर्षांपासून सुरू असलेल्या ब्लॅंकेट वाटप उपक्रमाला यंदा व्यापक स्वरूप मिळाले. रेल्वे स्टेशन, रस्त्याच्या कडेला रात्र काढणारे बेघर, तसेच वृद्धाश्रमातील निराश्रीतांना ब्लॅंकेट, जेवण आणि नाश्ता देण्यात आला. लोकवर्गणीतून जमा झालेल्या निधीतून गरजूंपर्यंत मदत पोहोचवण्यात आली. मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथील ऋतिक मालपे यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या डीएमएक्स ग्रुपने रक्तदानातही राज्यभरात लौकिक मिळवला आहे. वेळोवेळी आयोजित केलेल्या शिबिरांतून संकलित रक्तपिशव्यांमुळे या संघटनेला 'रक्तदात्यांचा देव'म्हणून ओळख मिळाली आहे. सदस्यांनी समाजाला संदेश दिला की, वृद्धांचा सांभाळ घरी करणे हीच खरी जबाबदारी आहे. या सेवायज्ञामुळे तरुणाईने सामाजिक बांधिलकीचे सुंदर उदाहरण घडवले आहे.

# वंदे मातरम गीताला 150 वर्ष पूर्ण, मोर्शीत देशभक्तीचा जल्लोष

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा उपक्रम

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी,** (दि. 18)– वंदे मातरम गीताच्या 150व्या वर्षपूर्तीचे औचित्य साधून मोर्शीत देशभक्तीचा उत्साह अनुभवायला मिळाला. श्री गोविंद प्रभू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या पुढाकाराने शिवाजी उच्च माध्यमिक शाळेच्या प्रांगणात तालुकास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी 9.50 वाजता अंदाजे 2500 विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी सामूहिक वंदे मातरम गायन करत परिसर देशभक्तीच्या भावनेने भारून गेला.



कार्यक्रमानिमित्त निबंध, चित्रकला, रांगोळी आणि नाटिका स्पर्धांनी उत्साह वाढवला. विविध राज्यांच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी विशेष लक्ष वेधून घेतले. उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, तहसीलदार सागर ढवळे, प्राचार्य डॉ. संतोष आगरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांनी वंदे मातरम हे अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देणारे गीत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीकांत देशमुख, प्राचार्य के. डी. फुटाणे यांच्यासह शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## 8 क्विंटल कापसाची चोरी


**अमरावती** - अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हुसेनपूर खेडगाव येथील शेतातून शनिवारी रात्री अज्ञात व्यक्तींनी 8 क्विंटल कापूस चोरून नेला. चोरीला गेलेल्या कापसाची किंमत सुमारे 56 हजार असून, शेतकरी जयहरी रामकृष्ण कोकाटे (74) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# शेतकऱ्याला कमी मिळालेल्या नुकसान भरपाई वरून लढा यशस्वी

## कृषी विमा कंपनीला ग्राहक आयोगाचे आदेश

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी** (दि.18)– सततधार पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्यानंतरही अल्प नुकसानभरपाई मिळालेल्या शेतकऱ्याने कृषी विमा कंपनीविरुद्ध दाखल केलेली तक्रार अखेर यशस्वी ठरली आहे. अंजनगाव बारी येथील शेतकरी मारोतराव किसनराव दरोळी यांनी सोयाबीन व तूर पिकाचा सन 2022-23 मध्ये काढलेला विम्याची योग्य रक्कम मिळाली.



2022-23 मध्ये मारोतराव दरोळी यांच्या शेतात पावसाचे पाणी साचल्याने संपूर्ण पिकाची नासधूस झाली.

तक्रार दिल्यानंतरही विमा कंपनीने कोणताही पंचनामा न करता त्यांच्या खात्यात केवळ 5300 रुपये जमा केले. प्रत्यक्षात नुकसान खूपच मोठे असल्याने दरोळी यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती येथे तक्रार दाखल केली. तब्बल 19 सुनावण्या पार पडल्या. विशेष म्हणजे, दरोळी यांनी स्वत:च आपली बाजू मांडली; कोणताही वकील नेमला नव्हता. दोन्ही बाजूंचे प्रतिपादन ऐकून आयोगाने 4 सप्टेंबर 2025 रोजी महत्त्वाचा निर्णय दिला. त्यानुसार भारतीय पिक विमा कंपनीने सेवेत त्रुटी व हयगय केल्याचे नमूद करून तक्रारदाराला उर्वरित 34,508 रुपये, दिनांक 27 सप्टेंबर 2023 पासून व्याजासह देण्याचे आदेश दिले. तसेच मानसिक व शारीरिक त्रासापोटी 10,000 रुपये अतिरिक्त भरपाई 45 दिवसांत अदा करण्याचे निर्देश केले. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या दरोळी यांना न्याय मिळाला असून इतर शेतकऱ्यांसाठीही हा निर्णय मार्गदर्शक ठरणार आहे.



# निवडणूकीच्या तोंडावर स्थानिक भाजप मध्ये नाराजी नाट्य?

## डॉ.अनिल बोंडे, विक्रम ठाकरेंच्या समर्थकांना डावलले

### ■ संधीचे सोने करण्याकरिता विरोधक सक्रीय

विलास पाटील

**वरुड,** (दि.18) – वरुड व शेंदूरजनाघाट नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी अंतिम उमेदवारी यादी दि. 17 रोजी जाहीर होताच राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. भारतीय जनता पार्टीचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे व काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेले माजी सभापती विक्रम ठाकरे यांच्या समर्थकांना उमेदवारीतून डच्चु दिला. त्यामुळे ऐन निवडणूकीच्या तोंडावर भाजपमध्ये नाराजी नाट्य रंगले असल्याची माहिती आहे. याचा थेट परिणाम निवडणूक लढतीवर होण्याची दाट शक्यता असल्याने या संधीचे सोने करण्यासाठी विरोधक सक्रीय झाले आहे.



निवडणूक समीक्षकांच्या मते, बोंडे व ठाकरे या दोघांच्या स्थानिक पातळीवरील संघटनात्मक पकडीमुळे भाजप ला मोठा आधार मिळत होता. त्यांच्याच गटातील संभाव्य उमेदवारांना तिकीट न मिळाल्याने स्वाभाविकच पक्षांतर्गत असंतोष वाढू लागला आहे. काही स्थानिक कार्यकर्त्यांनी तर योग्य उमेदवारांची छाटणी ही निवडणुकीतील मोठी रणनीतिक चूक असल्याची खुली चर्चा समाजमाध्यमांवर सुरु झाली आहे. दरम्यान, प्रतिस्पर्धी पक्षांनी भाजपमधील या नाराजीला हातोहात घेत प्रचार मोहीम सुरू केल्याची माहिती आहे. बोंडे आणि ठाकरे समर्थकांची नाराजी मतदानाच्या टक्केवारीवर आणि विशेषत: निर्णायक प्रभागांमध्ये भाजप च्या मतांवर परिणाम करू शकते, अशी राजकीय निरीक्षकांची धारणा आहे.

पक्षाने अंतर्गत गटबाजीला प्राधान्य देत काही मजबूत उमेदवारांना बाजूला केल्यामुळे आगामी निवडणुकीत अप्रत्याशित निकाल लागू शकतात. त्यामुळे या अंतिम यादीच्या निर्णयाचा भाजप ला डबल फटका बसतो की पक्ष नेतृत्व नाराजी आटोक्यात आणून निवडणूक सरशी मिळवतील हे येणाऱ्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे. या हालचालींमुळे वरुड व शेंदूरजनाघाटची निवडणूक अधिक चुरशीची बनली आहे.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक




# हृदयविकाराचे आधीच मिळतात संकेत

**जाणून घ्या**
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

आजकाल इतक्या कमी वयात लोकांना हार्ट अटॅक का येतो? फिट, हेल्दी दिसणारे लोकही क्षणार्धात कोसळतात. आज अनेक तरुणांनाही हार्ट अटॅक येतो आणि काहीजण आपला जीव गमावतात, पण हार्ट अटॅक कधीच अचानक येत नाही.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, दरवर्षी सुमारे एक कोटी ७९ लाख लोक लोक हार्ट अटॅकने मृत्युमुखी पडतात. अनेकांना वाटते, की हार्ट अटॅक अचानक येतो आणि त्याची कोणतीही पूर्वसूचना मिळत नाही. पण हे खरे नाही. एका संशोधनानुसार बहुतांश हृदयरोग हळूहळू वाढत जातात आणि त्यांची चिन्हे आधीच शरीरात दिसू लागतात.

**हृदयरोगाचे संकेत वेळीच ओळखा**

दक्षिण कोरिया आणि अमेरिकेतील संशोधकांनी केलेल्या अभ्यासानुसार, हार्ट अटॅक किंवा स्ट्रोक आलेल्या ९९ टक्के लोकांमध्ये काही वर्षांपूर्वीच लक्षणे दिसत होती. त्यात उच्च रक्तदाब, साखरेचे प्रमाण वाढणे, कोलेस्ट्रॉल जास्त असणे किंवा धूम्रपानाची सवय ही मुख्य धोक्याची चिन्हे होती. डॉक्टर सांगतात, या छोट्या पण महत्त्वाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास धोका वाढतो.

**हार्ट अटॅकपूर्वी शरीर देते हे संकेत**

* सतत थकवा जाणवणे किंवा ऊर्जेचा अभाव
* छोटे काम केल्यावरही श्वास लागणे
* छातीत फडफड किंवा हृदयाचे ठोके अनियमित होणे



* वारंवार छातीत जळजळ, अपचन
* उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल
* चालताना पायात गोळे येणे किंवा वेदना.
* जबडा, हात किंवा छातीत घट्टपणा
* अचानक घाम येणे किंवा चिंताग्रस्त वाटणे

**हार्ट अटॅक अचानक का येत नाही?**

संशोधकांनी नव्वद लाखांहून अधिक दक्षिण कोरियन आणि हजारो अमेरिकन लोकांवर वीस वर्षांचा अभ्यास केला. निष्कर्ष असाच निघाला की, हार्ट अटॅक येण्यापूर्वी शरीरात एक तरी संकेत आधी दिसतोच. अगदी रक्तदाब थोडा वाढला, साखर किंचित जास्त झाली किंवा कोलेस्ट्रॉल वाढले, तरीही ते हृदयरोगाचा संकेत मिळू शकतो. रक्तदाब, शुगर किंवा कोलेस्ट्रॉल थोडे वाढले तरी दुर्लक्ष करू नका. वेळेवर टेस्ट आणि उपचार केल्यास धोका कमी होतो.

**हार्ट अटॅकची मुख्य कारणे**

हार्ट अटॅक एका कारणामुळे होत नाही. त्यासाठी धूम्रपान, व्यायामाचा अभाव, जास्त तेलकट किंवा गोड पदार्थ, ताण-तणाव, अपुरी झोप आणि उच्च रक्तदाब ही मुख्य कारणे आहेत. यापैकी एक-दोन सवयींचाही हृदयावर विपरीत परिणाम होतो आणि रक्तवाहिन्यांत गुठळ्या होऊ लागतात.

**हार्ट अटॅकपासून बचाव कसा कराल?**

* नियमित आरोग्य तपासणी करा
* रक्तदाब, साखर, कोलेस्ट्रॉल तपासत राहा
* आरोग्यदायी आहार घ्या, धूम्रपान टाळा. दररोज थोडा व्यायाम करा
* ताण कमी ठेवा झोप घ्या

# डेंगीचा यकृतावर परिणाम

**व्याधी विकार**
डॉ. कुंदन गायकवाड




पावसाळा संपला आहे; पण डेंगीचा धोका पूर्णपणे नाहीसा झा-लेला नाही. हा विषाणू आपल्या शरीरावर हल्ला करतो आणि त्याचा रक्तातील प्लेटलेट्सवर सर्वाधिक परिणाम होतो. त्यांची संख्या कमी होत असताना, लोकांना अशक्तपणा, थकवा आणि रक्तस्त्राव यासारख्या समस्या येऊ लागतात; पण डेंगी केवळ प्लेटलेट्सवरच परिणाम करत नाही, तर तो आपल्या यकृतालाही हानी पोहोचवू शकतो.

अनेक प्रकरणांमध्ये डेंगी यकृताचे नुकसान करू शकतो. गेल्या काही दिवसांत डेंगीच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. यापैकी बहुतेक लोक तापानंतर बरे होतात; परंतु अनेकांना यकृताच्या समस्या जाणवतात डेंगीमुळे यकृताच्या पेशींचे लक्षणीय नुकसान होते. ही समस्या विशेषतः रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असणाऱ्या किंवा आधीच यकृताचा आजार असणाऱ्या रुग्णांमध्ये दिसून येते. डेंगी विषाणू शरीरात प्रवेश करून पेशींना नुकसान पोहोचवत असल्याने यकृताची जळजळ होते.

**डेंगीमध्ये यकृताचा सहभाग**

वैद्यकीय संशोधनातून असे दिसून आले आहे, की डेंगीमध्ये यकृताचा सहभाग सामान्य आहे. त्यात कावीळ, पोटदुखी, वाढलेले यकृत आणि वाढलेले यकृत एंझाइम यांचा समावेश आहे. डेंगीदरम्यान तुम्हाला ही लक्षणे आढळली तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. सतत जादा ताप आणि पोटदुखी, पिवळे डोळे आणि त्वचा, भूक न लागणे आणि उलट्या, पोटात सूज येणे किंवा जडपणा जाणवणे. वाढलेला थकवा आणि अशक्तपणा, रक्ताच्या उलट्या होणे किंवा लघवीत रक्त येणे या गोष्टी लक्षात ठेवा. डेंगीचा त्रास होत असेल, तर तुम्हाला धोका आहे की नाही हे ठरवण्यासाठी तुम्ही डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रक्त तपासणी नक्कीच करून घ्यावी. दुसरी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे भरपूर पाणी पिणे आणि शक्य तितके द्रवपदार्थ पिण्याचा प्रयत्न करणे. याव्यतिरिक्त तळलेले आणि मसालेदार पदार्थ पूर्णपणे टाळावेत. तुमच्यासाठी पचण्यास कठीण असलेले सर्व टाळावे.

# फुफ्फुसाच्या संसर्गामुळे श्वसनविकार

**धोका ओळखा**
डॉ. अभिजीत दिवटे

फुफ्फुसांचा संसर्ग म्हणजे जीवाणू, विषाणू किंवा बुरशीमुळे फुफ्फुसांमध्ये जळजळ किंवा संसग होणे. हा संसर्ग फुफ्फुसांच्या कार्यावर परिणाम करतो आणि त्यामुळे श्वसनाच्या समस्या उद्भवू शकतात. प्रतिकारशक्ती कमी असलेले लोक, वृद्ध, लहान मुले आणि मधुमेह किंवा जुनाट आजार असलेल्या लोकांना याचा सर्वाधिक धोका असतो.

धूम्रपान करणारे आणि वारंवार प्रदूषित हवेच्या संपर्कात येणाऱ्यांनाही याचा धोका असतो. फुफ्फुसांचे संक्रमण अनेक कारणांमुळे होऊ शकते. सर्वात सामान्य कारण म्हणजे सर्दी, फ्लू किंवा इतर श्वसन आजारादरम्यान फुफ्फुसांमध्ये पोहोचणाऱ्या बॅक्टेरिया आणि विषाणूंचा हल्ला. शिवाय, कमी प्रतिकारशक्ती, धूम्रपान, प्रदूषित वातावरणाचा संपर्क आणि दीर्घकाळ खोकला किंवा घशाच्या समस्या यामुळेदेखील संसर्गाचा धोका वाढतो.

मधुमेह, हृदयरोग किंवा दमा यासारखे जुनाट आजार असलेल्या काही लोकांमध्ये संसर्ग अधिक गंभीर असू शकतो. फुफ्फुसांची अस्वच्छता आणि खराब आहारदेखील धोका वाढवतो. म्हणून, लक्षणे दिसू लागताच त्वरित लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे. फुफ्फुसांच्या संसर्गाची लक्षणे सौम्य किंवा गंभीर असू शकतात. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये अनेकदा सतत खोकला, श्लेष्मा किंवा कफ, सौम्य ताप, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास होणे यांचा समावेश असतो. काही प्रकरणांमध्ये, छातीत दुखणे, उच्च ताप, हाडे किंवा स्नायू दुखणे, शिंका येणे किंवा घशात जळजळदेखील होऊ शकते. गंभीर संसर्गांमध्ये श्वास घेण्यास त्रास होणे, जलद श्वास घेणे, निळसर किंवा फिकट चेहरा आणि सतत उच्च ताप येणे यांचा समावेश असू शकतो. जर ही लक्षणे दिसली तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, कारण संसर्ग फुफ्फुसांच्या कार्यावर परिणाम करू शकतो आणि जीवघेणा बनू शकतो.



**प्रतिबंधात्मक टिप्स**

* मास्क घाला आणि प्रदूषित किंवा गर्दीच्या ठिकाणी टाळा.
* खोकताना किंवा शिंकताना वारंवार हात धुवा आणि रुमाल किंवा कोपर वापरा.
* धूम्रपान आणि सिगारेटपासून दूर राहा.
* तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या.
* वेळेवर लसीकरण करा, जसे की फ्लू किंवा न्यूमोकोकल लस.
* तुमच्या घरात आणि परिसरातील हवा स्वच्छ ठेवा आणि वायुवीजनाकडे लक्ष द्या.

# बदलते हवामान दमेकऱ्यांना घातक

**घ्या काळजी**
डॉ. कुंदन गायकवाड

बदलत्या हवामानामुळे दम्याच्या रुग्णांना धोका वाढतो. दमा हा फुफ्फुसांचा एक जुनाट आजार आहे. त्यामुळे श्वसनमार्गात जळजळ आणि अरुंदता येते. श्वास घेण्यास त्रास होणे, खोकला येणे, छातीत घट्टपणा येणे आणि शिट्टी वाजणे ही सामान्य लक्षणे आहेत.

अति थंडी किंवा उष्णता, धूळ, परागकण आणि प्रदूषण दमा निर्माण करू शकते. बदलत्या हवामानात हवेतील आर्द्रता, थंडी किंवा उष्णतेमध्ये अचानक बदल दम्याच्या रुग्णांसाठी आव्हानात्मक असू शकतात. या घटकांमुळे रुग्णांमध्ये श्वास घेण्यास त्रास, सतत खोकला आणि छातीत घट्टपणा वाढू शकतो. हा आजार कोणत्याही वयात होऊ शकतो; परंतु त्याचे परिणाम मुले आणि वृद्धांमध्ये अधिक तीव्र असतात.

**बदलत्या हवामानात दम्याच्या रुग्णांनी कशी काळजी घ्यावी?**

बदलत्या हवामानात दम्याच्या रुग्णांनी सावधगिरी बाळगणे अत्यंत महत्वाचे आहे. प्रथम, तुमची औषधे आणि इनहेलर नियमितपणे वापरा आणि डॉक्टरांनी सांगितलेल्या डोसमध्ये घ्या. हवामानानुसार घरचे वातावरण स्वच्छ आणि धूळमुक्त ठेवा. थंड वारा किंवा पावसात बाहेर जाणे टाळा आणि आवश्यक असल्यास मास्क घाला. व्यायाम आणि योगामुळे फुफ्फुसांची क्षमता सुधारते; परंतु हवामानानुसार मध्यम व्यायाम करा. हिवाळ्यात खोलीत आर्द्रता राखा आणि उन्हाळ्यात हवेशीर रहा.



अचानक खोकला किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल, तर ताबडतोब आपत्कालीन सेवांशी संपर्क साधा. दमा नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमित तपासणी आणि फुफ्फुसांच्या कार्य चाचण्या आवश्यक आहेत.

**उपाय**

* धूळ, धूर आणि प्रदूषण टाळा.
* थंड हवेत बाहेर जाताना स्वच्छ कपडे आणि शाल घाला.
* घराची नियमित स्वच्छता आणि वायुवीजन सुनिश्चित करा.
* धूम्रपान आणि धुराच्या ठिकाणांपासून दूर राहा. खोकला, रक्तसंचय किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# आरोग्यदायी मसाले

**आरोग्य चर्चा**

दालचिनीचा वापर पदार्थाची चव दुपटीनं वाढवतो. दालचिनी हा सुगंधी मसाल्याचा प्रकार. रस्सेदार भाज्या, पुलाव तसंच गोड पदार्थांमध्येही दालचिनी घातली जाते. ही दालचिनी मधुमेहींसाठी वरदान ठरू शकते, असं एका संशोधनातून समोर आलंय. शरीर इन्शुलिनचा प्रतिकार करत असेल तर दालचिनीमुळे याला आळा बसू शकतो. म्हणजेच मधुमेह नियंत्रणात दालचिनी महत्त्वाची भूमिका बजावते. तसंच अपचन, सर्दी, जुलाब, रक्ताभिसरणात येणारे अडथळे यावरही दालचिनी उपयुक्त ठरते.

* लवंग हा असाच एक औषधी पदार्थ. दातांच्या समस्यांवर लवंगाचा वापर हमखास केला जातो. बॅक्टेरियामारक गुणधर्मामुळे दातदुखीत दाढेखाली लवंग ठेवण्याचा सल्ला दिला जातो. जास्त जेवळ झाल्यानंतर अस्वस्थ वाटत असेल तर लवंगेमुळे आराम पडतो. उलट्या, जुलाब, अपचन, पचनसंस्थेतील बिघाड यावर लवंग हा रामबाण उपाय ठरू शकतो.
* जिऱ्यामुळे फोडणीची लज्जत अधिक वाढते. हे साधंसं जीरं अनेक रोगांवरचं औषध ठरू शकतं. पचनसंस्थेच्या तक्रारी, ॲनिमिया आणि सर्दी यावर जीरं लाभदायक ठरतं.



मूळव्याधीची समस्या दूर करण्याचे आश्चर्यकारक गुणधर्म जीऱ्यात असतात. जीऱ्यामुळे शरीराला लोह आणि मॅंगनिज ही खनिजं मिळतात. यामुळे हाडांमध्ये कॅल्शियम शोषलं जातं. तसंच रक्तदाबही नियंत्रणात राहतो.

* बिर्याणी, पुलावची लज्जत वाढवणारी मसाल्याची मोठ्या आकाराची वेलचीही आरोग्यदायी आहे. पचनाच्या तक्रारी तसंच गॅसच्या समस्या असल्यास या वेलचीचं सेवन करावं. गळ्याच्या तक्रारी, छातीत कफ जमणे, दाढ दुखणं या समस्यांवरही मसाल्याची वेलची प्रभावी ठरते.
* केशरात अनेक आरोग्यदायी गुणधर्म असतात. नैराश्य, दृष्टीदोष, विस्मरण यावर केशर प्रभावी ठरतं. पचनाच्या तक्रारींवरही केशर उपकारक आहे. गॅस, बद्धकोष्ठता या तक्रारी दूर करण्याची क्षमता काळ्या मिरीत असते. यात बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. रक्तदाब नियंत्रणावर काळीमिरीचा वापर होतो. यात भरपूर प्रमाणात लोह असतं.

# स्लिप्ड डिस्कविषयी...

**व्याधी विचार**

आपल्या पाठीचा कणा विविध प्रकारच्या हाडांनी बनलेला असतो. ही हाडं एकमेकांमध्ये गुंतलेली असतात. त्यांना डिस्क म्हणजे चकतीचं आवरण असतं. चालताना, धावताना तसंच दैनंदिन कामं करताना बसणारे धक्के सहन करून हाडांचं रक्षण करण्याची जबाबदारी या चकत्यांची असते. प्रत्येक चकतीचे दोन भाग असतात. मुलायम, निसरडा असा आतला भाग आणि टणक असा बाहेरचा भाग. दुखापत किंवा अशक्तपणामुळे चकतीचा आतला भाग बाहेरच्या भागाला भेदून पुढे ढकलला जातो. यालाच स्लिप्ड डिस्क असं म्हणतात. यामुळे वेदना आणि अस्वस्थता जाणवते. स्लिप्ड डिस्कमुळे पाठीच्या कण्याची एखादी नस दाबली गेली तर आसपासच्या भागात वेदना जाणवतात. तो भाग बधीरही होतो. या विकाराची तीव्रता अधिक असेल तर शस्त्रक्रिया करून स्लिप्ड डिस्कवर उपचार केले जातात.

**लक्षणं जाणून घ्या**

स्लिप्ड डिस्क पाठीच्या कण्याच्या कोणत्याही भागात होऊ शकते. मानेपासून पाठीच्या खालच्या भागापर्यंत कुठेही हा त्रास जाणवू शकतो. त्यातही पाठीच्या खालच्या भागात स्लिप्ड डिस्क होण्याची शक्यता बरीच जास्त असते. शरीराच्या एका बाजूला जाणवणाऱ्या वेदना आणि बधिरता त्रास देते. स्लिप्ड डिस्कमुळे होणाऱ्या वेदना हात आणि पायांपर्यंत जाणवतात. रात्री जास्त वेदना जाणवणं किंवा विशिष्ट प्रकारची हालचाल केल्यावर वेदना होणं, उभं राहिल्यावर किंवा बसल्यावर वेदनांची तीव्रता वाढणं, थोडं अंतर चालल्यानंतर वेदना जाणवणं, स्नायूंमध्ये अशक्तपणा जाणवणं ही स्लिप्ड डिस्कची सर्वसाधारण लक्षणं आहेत. ही लक्षणं व्यक्तीगणिक बदलतात.




**का उद्‌भवते समस्या?**

पाठीच्या कणाच्या चकतीचा बाहेरचा भाग कमकुवत झाल्याने आतला भाग त्यातून बाहेर पडतो तेव्हा हा त्रास होतो. वाढतं वय हे यामागचं महत्त्वाचं कारण असू शकतं. काही हालचालींमुळेही हा त्रास होऊ शकतो.

# ऑटोइम्युन आजार आणि महिला

**आपण कुठे चुकतो**
डॉ. मेघा पटारे

भारतात ऑटोइम्यून आजार असलेल्या एकूण रुग्णांपैकी सुमारे ७० टक्के रुग्ण महिला आहेत. त्या २० ते ५० वयोगटातील आहते. हार्मोनल आणि जीवनशैलीचे घटक सर्वात जास्त सक्रिय असतात. शरीराची संरक्षण प्रणाली, जी सामान्यतः संसर्गापासून संरक्षण करते, चुकून स्वतःच्या ऊतींवर हल्ला करते, तेव्हा ऑटोइम्यून विकार उद्भवतात. सामान्य आजारांमध्ये ऱ्हुमॅटॉइड आर्थ्रायटिस, ल्युपस, थायरॉइडायटिस, सोरायसिस आणि स्जोग्रेन्स सिंड्रोम यांचा समावेश आहे. हे आजार सांधे, त्वचा, रक्तवाहिन्या आणि हृदय किंवा फुफ्फुसांसारख्या अंतर्गत अवयवांवर परिणाम करू शकतात. महिला अनेकदा उशिरा तक्रार नोंदवतात. कारण त्या सातत्याने लक्षणांकडे दुर्लक्षित करतात. अनुवांशिक रचना, प्रजनन वयात आणि बाळंतपणानंतर हार्मोनल बदल, ताणतणाव, लठ्ठपणा आणि पौष्टिक कमतरता यामुळे त्यांना स्वयंप्रतिकार रोग होण्याची शक्यता जास्त असते. दर आठवड्याला, मी अशा महिलांना भेटतो, ज्यांना निदान होण्यापूर्वी वर्षानुवर्षे अस्पष्ट सांधेदुखी किंवा सूज येत आहे. अनेक महिला त्यांच्या ३० किंवा ४० च्या वयोगटातल्या आहेत.




# फ्लूकडे दुर्लक्ष नको


**आरोग्यवेध**

फ्लू हा सर्वसाधारण विकार आहे. तो हंगामी विषाणूंमुळे होतो. यात सौम्य ते तीव्र स्वरूपाची लक्षणं दिसून येतात. काही रूग्ण आठवडाभरात बरे होतात तर काही रूग्णांमध्ये बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते. ६५ वर्षांपुढच्या रूग्णांमध्ये गुंतागुंतीची शक्यता बरीच जास्त असते. ज्येष्ठ नागरिकांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झालेली असते. कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे शरीर विषाणूंना प्रतिकार करू शकत नाही. फ्लूचा संसर्ग वाढला तर त्याचं रूपांतर निमोनियात होऊ शकतं. निमोनिया झालेल्या रूग्णाला रूग्णालयात दाखल करावं लागतं. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी.

फ्लू आणि सर्वसामान्य सर्दी यात फरक असतो. आजारी पडल्यानंतर फ्लू आणि सर्दी यातला फरक जाणून घेणं गरजेचं आहे. फ्लू आणि सर्दी यांची लक्षणं सारखीच असली तरी सर्दीची लक्षणं बरीच सौम्य असतात तर फ्लूची बरीच लक्षणं साध्या सर्दीत दिसून येत नाहीत.

**फ्लू आणि सर्दीची लक्षणं**

नाक गळणं, छातीत कफ साठणं, घसा दुखणं, खोकला ही सर्दी आणि फ्लूची सर्वसाधारण लक्षणं आहेत. फ्लू असेल तर अतिरिक्त लक्षणं दिसून येतात. त्यात ताप, अंगदुखी, थंडी, थकवा, अशक्तपणा, अस्वस्थता जाणवणं, तीव्र डोकेदुखी यांचा समावेश आहे.



६५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या लोकांना ही लक्षणं जाणवली तर पुढची गुंतागुंत टाळण्यासाठी त्यांनी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

**नवसंशोधन**

## ...म्हणून लोक पत्करतात धोका!



काही लोक धोके पत्करतात. धाडसी खेळ खेळतात. दुसरीकडे काहींना उंचावर जाण्याचीही खूप भीती वाटते. मेंदूतल्या विशिष्ट प्रकारच्या पेशींमुळे असं होतं ही बाब एका संशोधनातून समोर आली आहे. ओएलएम नावाच्या या पेशी धोका पत्करण्याच्या मानसिकतेत महत्त्वाची भूमिका बजावतात. हा शोध अस्वस्थता, चिंता, काळजी, नैराश्य यांसारख्या मानसिक विकारांवरील उपचारांसाठी मैलाचा दगड ठरेल, अशी अपेक्षा आहे.

**दंतारोग्य**

## कारणं श्वासाच्या दुर्गंधीची



वैद्यकीय भाषेत श्वासाच्या दुर्गंधीला 'हॅलीटोसिस' असं म्हटलं जातं. तोंडाची आणि दातांची अस्वच्छता हे तोंडाच्या दुर्गंधीचं महत्त्वाचं कारण आहे. दातांमध्ये अडकलेल्या अन्नकणांवर बॅक्टेरिया वाढतात. या बॅक्टेरियांमुळे तोंडाला दुर्गंधी येते. तोंड कोरडं पडणं हे सुद्धा तोंडाच्या दुर्गंधीचं कारण आहे. हिरड्यांशी संबंधित विकारांमुळेही तोंडाला दुर्गंधी येते. त्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीचं कारण जाणून घेऊन त्यावर योग्य ते उपचार करायला हवेत.

**डोळ्यांचं आरोग्य**

## डोळ्यांना दुखापत झाल्यास....



डोळा हा आपल्या शरीराचा अत्यंत नाजूक असा अवयव आहे. त्यामुळे डोळ्याला होणारी कोणतीही दुखापत किंवा संसर्ग गंभीर स्वरूपाचा असू शकतो. डोळ्याला दुखापत झाली की तातडीने औषधोपचार व्हायला हवेत. यामुळे संभाव्य नुकसान टळू शकतं. डोळा दुखणं, सतत पाणी येणं, डोळे लाल होणं, पापण्या सुजणं ही डोळ्यांच्या दुखापतीची लक्षणं आहेत. त्यामुळे डोळ्यांना दुखापत झाली की तातडीने डॉक्टरांकडे जायला हवं.

**आजीबाईचा बटवा**

## प्रथिनयुक्त पालक



आहारात प्रथिनांचा समावेश करायला हवा. अंडी, मांस आणि मासे हे प्रथिनांचे उत्तम स्त्रोत आहेत. शाकाहारींसाठीही प्रथिनं मिळवण्याचे बरेच पर्याय आहेत. त्यापैकी एक म्हणजे पालक. पालकामध्ये भरपूर प्रमाणात प्रथिनं असतात. यासोबतच त्यात भरपूर लोह, जीवनसत्त्व, खनिजं आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे आहारात पालकाचा समावेश करायला हवा.

## बिबट्याचे मानवावरील हल्ले राज्य आपत्ती घोषित होणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :
राज्यात बिबट्यांकडून वाढत चाललेल्या मानवहल्ल्यांची समस्या राज्य आपत्ती म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत मांडावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. तसेच बिबट्यांना वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या शेड्यूल-१ मधून वगळून शेड्यूल-२ मध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्तावही तयार करून सादर करावा.



मानवांवर हल्ले करणाऱ्या बिबट्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक ठिकाणी तातडीने पिंजरे बसवावेत. यासोबतच, पुणे जिल्ह्यात बिबट्यांच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी दोन रेस्क्यू सेंटर पुढील दोन ते तीन महिन्यांत सुरू करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागांना दिले.

बिबट्याकडून मानवावर होणारे हल्ल्यांची समस्या ही राज्य आपत्ती घोषित करण्यासंबंधीचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीसमोर ठेवण्यात यावेत. तसेच बिबट्यांना शेड्यूल एक मधून काढून शेड्यूल दोन मध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावे. मानवावर हल्ले करणाऱ्या बिबट्यांना आळा घालण्यासाठी तातडीने आवश्यक त्या ठिकाणी पिंजरे पुरविण्यात यावेत, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

राज्यातील बिबट्यांच्या प्रश्नांसंदर्भात मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार शरद सोनवणे, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील आदी उपस्थित होते.

**बिबटयांची नसबंदी होणार**

बिबट्यांचा समावेश शेड्यूल एक मध्ये आहे. त्यामुळे नरभक्षक बिबट्यांन पकडणे, त्यांना मारणे यावर मयार्दा येतात. त्यामुळे बिबट्यांना शेड्यूल एकमधून काढण्यासंबंधी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी केंद्र शासनाकडून मिळाली आहे. त्यामुळे नरभक्षक बिबट्यांना शोधून नसबंदी करण्यात यावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. पुणे जिल्ह्यात दोन बचाव केंद्रे सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# कामठी नगरपालिकेत बावनकुळेंविरुद्ध सुलेखा कुंभारे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्या कट्टर समर्थक आणि बहुजन-रिपब्लिकन एकता मंचच्या प्रमुख सुलेखा कुंभारे यांची १५ वर्षापासूनची मैत्री आहे. या मैत्रीखातरच कुंभारे यांचा पक्ष सर्वच निवडणुकांमध्ये भाजपला पाठिंबा देत आला आहे. मात्र कुंभारेंची कर्मभूमी कामठीत त्यांना भाजपने दुखावले असून येथे होणाऱ्या नगर पालिका निवडणुकीत भाजप विरुद्ध सुलेखा कुंभारे यांचा पक्ष अशी लढत होत आहे.

भाजपने येथे नगराध्यक्षपदाची उमेदवारी अग्रवाल यांना दिली आहे तर कुंभारे यांच्या पक्षातर्फे अजय कदम यांनी अर्ज दाखल केला आहे. भाजपने युतीचा प्रस्ताव फेटाळला, असा आरोप कदम यांनी वृत्तवाहिन्यांशी बोलताना केला. कामठी हा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मतदारसंघ आहे. हे येथे उल्लेखनीय.

नगर पालिका निवडणुकीत अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत कामठीत भाजप-बरिएमची युती होईल, अशीच चर्चा होती. बरिएमच्या प्रमुख सुलेखा कुंभारे यांनी सुद्धा हाच दावा केला होता.

मात्र भाजपकडून अग्रवाल यांचे नाव अध्यक्षपदासाठी जाहीर झाले, त्यांचा अर्ज भरण्यासाठी खुद्द बावनकुळे आले, त्याच वेळी भाजप-बरिएमची युती तुटल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर बरिएमकडून या पक्षाचे माजी नगरसेवक अजय कदम यांनी अर्ज दाखल केला.





सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बरिएमकडून भाजपला युतीचा प्रस्ताव देण्यात आला होता. नगरसेवकांच्या काही जागांच्या संदर्भात तो प्रस्ताव होता.मात्र पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत पुढे काहीच चर्चा केली नाही.

बरिएमने तर भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली, तरी सुद्धा बावनकुळे यांनी यावर सकारात्मक किंवा नकारात्मक असा कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे शेवटपर्यंत बरिएमचे नेते भाजपच्या उत्तराची वाट बघत राहिले. आणि अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी थेट नगराध्यक्षपदाचाच अर्ज दाखल केल्याने बरिएमची कोंडी झाली, त्यामुळे त्यांनी त्यांचा नगराध्यक्ष आणि नगरसेवकाच्या सर्व जागांसाठी उमेदवार दिले.

त्यामुळे कामठी नगर पालिकेत भाजपचा मित्रपक्ष असलेला बरिएम यांच्यात लढत होईल. बरिएमच्या अध्यक्ष सुलेखा कुंभारे या प्रथमच या निमित्ताने भाजपच्या विरोधात प्रचार करताना दिसणार आहेत . बरिएम आणि भाजपाच्या भविष्यातील संबंधांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## जगत्पुरिया यांना जीवनगौरव पुरस्कार

■ वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. १८ :
ख्यातनाम कवी, लेखक, समीक्षक प्रा. डी. बी. जगत्पुरिया यांना राज्यस्तरीय आदर्श गुणीजनरत्न जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.



कुटासा ता. अकोट येथील तरुणाई फाउंडेशन या संस्थेतर्फे २०२५-२६ चा हा पुरस्कार सातव्या अकोला येथे होणाऱ्या अकोला जिल्हा मराठी साहित्य संमेलनात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येईल.

प्रा. डी. बी. जगत्पुरिया यांना यापूर्वीही अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांच्या नावावर अनेक कवितासंग्रह, कथासंग्रह, कादंबऱ्या, समीक्षाग्रंथ अशी मोठी ग्रंथसंपदा आहे. हा जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डी.बी. जगत्पुरिया यांचे साहित्यीक आणि मित्रमंडळींकडून अभिनंदन होत आहे.

# उबाठा आणि मनसेचे अस्तित्वच उरले नाही

### राज्यमंत्री पंकज भोयर यांचा ठाकरे बंधूंवर हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
मागच्या अनेक दिवसांपासून आपण बघतो आहोत की उबाठा असो की मनसे त्यांचा काहीही बेस राहिलेला नाही, त्यामुळे मतदार त्यांच्या मागे नसल्याने सर्व निवडणुकीत त्यांना अपयश आलेले आहे. किमान एकत्र लढल्यावर तरी आपले काही उमेदवार निवडून येतील का? याची ठाकरे बंधूकडून चाचपणी सुरू आहे, असे राज्यमंत्री पंकज भोयर यांनी म्हटले आहे.

पंकज भोयर म्हणाले की, शालार्थ आयडी घोटाळ्याची व्याप्ती लक्षात घेत त्या ठिकाणी राज्यस्तरीय एसआयटीचे गठन करण्यात आले आहे. एसआयटीमार्फत संपूर्ण राज्याची तपासणी सुरू आहे. परंतू जर काही ठिकाणी कुणाचाही दोष नसताना पगार विलंबित होत असतील तर निश्चितपणे तातडीने दखल घेत अशा सर्व शिक्षकांचे पगार तातडीने करण्याचे निर्देश देण्यात येईल.

पंकज भोयर म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक असते, अशावेळी वरीष्ठासमोर पेच होता की कुठली जागा कोणत्या पक्षासाठी सोडायची.



अखेर तिन्ही पक्षाचे नेते एकत्र बसून निर्णय झाला की स्थानिक पातळीवर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सूचना होत्या की तुम्ही महायुती करावी की स्वतंत्र लढावे हा निर्णय तुम्ही आपल्या सोयीनुसार घ्यावा. त्यानुसार निर्णय घेण्यात आले. बहुतेक ठिकाणी भाजप मजबूत असल्याने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेण्यात आला.

**उमेदवार पळवले नाहीत**

पंकज भोयर म्हणाले की, उमेदवारांची पळवा-पळवी क्वचितच ठिकाणी झाली आहे. परंतु अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते त्या त्या विचारांशी जोडलेले असतात. एक-दोन ठिकाणी सोडले तर बाकी बहुतांश ठिकाणी पक्षाचे कार्यकर्तेच आपल्या पक्षाच्या चिन्हावरच लढत आहेत.

**..तर वेळ वाढवणार**

पंकज भोयर म्हणाले की, लाडकी बहिण योजनेमध्ये राज्यातील अनेक बहिणींनी सहभाग नोंदवला. त्यांची नोंदणी झालेली आहे. ए- ङउ करण्याकरता जर कालावधी कमी पडत असेल तर आम्ही वेळ वाढवून देण्यासाठी सकारात्मक विचार करू.मेळघाट प्रकरणी ज्या काही तक्रारी प्राप्त झाल्या असतील त्याची चौकशी करत आम्ही कारवाई करू.

# वंचितसोबत आघाडी घोषित... ती तोडण्याचा प्रश्न नाही..

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे ठाम मत

■ महासागर प्रतिनिधी, बुलडाणा, दि. १८ :
नांदेडमध्ये वंचित बहुजन आघाडीसोबत आमची आघाडी घोषित झाली आहे. ती तोडण्याचा कुठेही प्रश्न नाही. कारण आमच्यामध्ये तसे काहीही वाद किंवा मत भिन्नता नाही. काँग्रेसने युती-आघाडी संदर्भात स्थानिक पातळीवरच्या नेत्यांना अधिकार दिले आहेत. त्यानुसार नांदेडमध्ये वंचितनेही निर्णय घेतला. पण दोन्ही पक्षांनी वेगवेगळे अर्ज भरले आहेत, हे टाळले जाणं गरजेचे होते, यापुढे जाण्यासाठी काँग्रेसची सकारात्मक भूमिका असेल,असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

सपकाळ म्हणाले की, संविधानवादी सर्व लोकांनी एकत्र यावे अशी लोकांची भावना आहे. शिव-शाहू-आंबेडकरांचा लढा पुढे घेऊन जाण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी हवे ते प्रयत्न करण्याची माझी जबाबदारी आहे, मी त्यासाठी काम करेल. कोणत्या पक्षाला कुठे सोबत घ्यायचे या संदर्भात प्रत्येकाचे स्वतंत्र विचार आहे. पक्ष म्हणून सोबत घेणं आणि मविआ म्हणून सोबत घेणं हा विषय वेगळा आहे. त्यांनी इतर नेत्यांशी चर्चा करत प्रस्ताव ठेवला पाहिजे. त्याशिवाय चर्चाच होऊ शकत नाही. त्यामुळे अनावश्यक ज्या गोष्टी आहेत त्या सर्वांनी मिळून टाळल्या पाहिजे, त्यासाठी काँग्रेससुद्धा काम करत राहील.



सपकाळ म्हणाले की, ठाकरे गटाने त्यांच्या मुखपत्रातून केलेली तुलनेत किती दम आहे याचा विचार होण्याची गरज आहे. इंडिआ आघाडीमध्ये लोकसभा आम्ही सोबत लढलो त्यावेळी आम्हाला मोठे यश मिळाले. मविआ आघाडी करत विधानसभेची निवडणूक लढलो त्यावेळी आम्हाला यश आले नाही, या दोन्ही निवडणुकीत तिसरा कुणी सोबत घेण्याची चर्चा नव्हती. एका निवडणुकीत आम्हाला यश मिळाले आणि दुसऱ्या निवडणुकीत आम्हाला यश मिळाले नाही. कारण मत चोरी झाली. जी गोष्ट महाराष्ट्रात झाली तीच गोष्ट हरियाणा आणि बिहारमध्ये झाली. बिहारमध्ये यशस्वी यादवसोबत असताना आमचा पराभव झाला, परंतु, बिहार आणि महाराष्ट्र निवडणुकीची तुलना करण्याची काही गरज नाही.

# गडचिरोलीत शिंदे गटाच्या महिला पदाधिकारी बेपता

### उमेदवारी नाकारल्याने मानसिक धक्का, पतीचे पदाधिकाऱ्यांवर आरोप

■ महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. १८ :
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथे एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे.



नगरपालिकेसाठी उमेदवारी नाकारल्याने शिवसेना शिंदे गटाच्या महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अर्चना गोंदोळे या कालपासून बेपत्ता झाल्या आहेत. या प्रकरणी अर्चना गोंदोळे यांच्या पतीने स्थानिक पदाधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. उमेदवारी नाकारल्याने त्यांना जबर मानसिक धक्का बसला असून, याच विवंचनेतून त्या घरातून निघून गेल्याचे त्यांचे पती संतोष गोंदोळे यांचे म्हणणे आहे.

अर्चना गोंदोळे या अनेक वर्षांपासून राजकारण आणि समाजकारणात सक्रिय आहेत. त्यामुळे आरमोरी नगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांना पक्षाकडून नगरसेवक पदाकरिता उमेदवारी मिळेल, अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र, पक्षांतर्गत राजकारणामुळे त्यांना ऐनवेळी उमेदवारी नाकारण्यात आली. इतकेच नव्हे, तर त्यांच्या ऐवजी इतर पक्षातून आलेल्या एका महिलेला संधी देण्यात आल्यामुळे गोंदोळे अत्यंत दुखावल्या होत्या. याच नैराश्यातून त्या बेपत्ता झाल्या आहेत.

बेपत्ता अर्चना गोंदोळे यांचे पती संतोष गोंदोळे यांनी शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर थेट आणि अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. स्थानिक पदाधिकाऱ्यांनी नगरपालिकेसाठी 'पैसे घेऊन' उमेदवारी वाटप केली, ज्यामुळे अर्चना यांना डावलण्यात आले, असा आरोप संतोष गोंदोळे यांनी केला.

अर्चना यांच्या जीवाचे काही बरे-वाईट झाल्यास याला सर्वस्वी शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी जबाबदार असतील, असेही ते म्हणाले.

अर्चना गोंदोळे यांच्या बेपत्ता होण्याबाबत पती संतोष गोंदोळे यांनी अद्याप पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल केली नसल्याचे पोलिस सूत्रांनी स्पष्ट केले आहे. पोलिस बेपत्ता व्यक्तीचा शोध घेत आहेत, मात्र अधिकृत तक्रारीअभावी पुढील कार्यवाही मंदावली आहे.

**जिल्हाप्रमुखांनी आरोप फेटाळले**

या संदर्भात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख संदीप ठाकूर यांनी आपली बाजू मांडली आहे. त्यांनी संतोष गोंदोळे यांचे आरोप फेटाळून लावले आहेत. उमेदवारी वाटपासंदर्भातील निर्णय पक्षाच्या वरिष्ठ स्तरावरून झालेला आहे. यात माझी किंवा स्थानिक पदाधिकाऱ्यांची कुठलीही भूमिका नाही. उलट, संबंधित महिला पदाधिकाऱ्याच्या पतीनेच (संतोष गोंदोळे) गोंधळ घातल्याचा दावा संदीप ठाकूर यांनी केला आहे.

दरम्यान, आरमोरीत राजकीय वतुर्ळात खळबळ माजली आहे. स्थानिक नेतृत्वावर झालेल्या आरोपांमुळे पक्षात अंतर्गत वाद वाढण्याची शक्यता आहे. स्थानिक निवडणुकीच्या तोंडावर या प्रकरणामुळे विरोधकांना आयते कोलीत मिळाले आहे.

## एका कलाशिक्षकाचा अभ्यासाला चालना देणारा छंद

लोकमानस



सुरेश वरगंटीवार यांनी निरनिराळ्या वर्तमानपत्र व नियतकालिकांमधून कलाविषयक आलेल्या माहितीचा संग्रह करण्याचा छंद २० वर्षांपासून जोपासला आहे. ते पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये (रमणबाग) कलाशिक्षक व पर्यवेक्षक आहेत. विद्यार्थ्यांना चित्रकला आत्मसात करताना शिल्प, स्थापत्य, संग्रहालयं, पुरातत्त्व यासारख्या विषयांचीही तोंडओळख व्हावी म्हणून ही कात्रणं त्यांनी जमवली आहेत.

एखादा कलाशिक्षक आपल्या व विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा विस्तारण्यासाठी किती व कशी मेहनत घेतो, याचं चालतंबोलतं उदाहरण म्हणजे सुरेश वरगंटीवार. चित्रकला हा विषय आपल्या विद्यार्थ्यांना अधिकाधिक जवळचा वाटावा, त्यात त्यांना जोमदार करिअर करावंसं वाटावं, या उद्देशाने वरगंटीवार माहितीचं दुर्लभ भांडार पुरवतात.

यासाठी २० वर्षांपासून त्यांनी वर्तमानपत्र व नियतकालिकांमध्ये कलाविषयक येणाऱ्या बातम्या, लेख, मुलाखती, समीक्षा व छायाचित्रांची कात्रणं जमविण्याचा छंद जोपासला आहे. आतापर्यंत ७५० कात्रणांचा संग्रह त्यांनी केला आहे.

वरगंटीवार म्हणाले, चित्रं, व्यंगचित्र, बालकांनी काढलेली चित्रं, भारतीय व परदेशांतील चित्रकार, चित्रप्रदर्शनं, कार्यशाळा, परीक्षण, घडामोडी अशा अनेक घटनांचा हा एक प्रकारचा दस्तऐवज तयार झाला आहे. वरगंटीवार यांनी केवळ चित्र एके चित्र, अशी कडेकोट सीमा न ठेवता विद्यार्थ्यांच्या कलाविषयक जाणिवा बहराव्या यासाठी विविध कलाक्षेत्राबद्दल मिळणारं अक्षरधन जतन केलं आहे.

यात शिल्प, मातीकाम, पुरातत्त्व, मंदिराचं स्थापत्य, संग्रहालयं, हस्तलिखितं वगैरेंवरचं साहित्य वर्गवारी करून पाच अल्बममध्ये सांभाळून ठेवलं आहे.

त्यांनी असंही सांगितलं की, चित्रकलेचा उपयोग विद्यार्थ्यांना जीवनात आनंद फुलविण्यासाठी करता यावा. यात उत्तम प्रकारे करिअर करण्याची प्रेरणा त्यांना व्हावी. या दृष्टिकोनातून संगणकाचा चित्रकलेसंबंधी वापर, ॲनिमेशन तसंच सुलेखन वगैरेंवरची कात्रणं त्यांना दाखवतो. त्यातल्या काही गोष्टी सोप्या भाषेत समजावून सांगतो.

विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या उपक्रमांसाठी या संग्रहाचा उपयोग होतो. हे पाहून माझे चित्रकार गुरू मिलिंद फडके यांनी स्वतः लिहिलेले ४० लेख यात भर घालायला दिले, ही फार मोठी पावती वाटते.

■ ■ ■

## निर्यात उत्कृष्टता पुरस्कार समारंभ आणि प्लेक्सकॉन्सिलचा प्लॅटिनम महोत्सव



अलीकडेच मुंबईत झालेल्या प्लेक्सकॉन्सिलच्या निर्यात उत्कृष्टता पुरस्कार समारंभ आणि प्लॅटिनम महोत्सव समारंभात माननीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल प्रमुख पाहुणे होते.

परिषदेने भारताच्या प्लास्टिक निर्यात उद्योगाला ७० वर्षे पूर्ण केल्यामुळे हा एक ऐतिहासिक टप्पा आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांनी २०२३-२४ आणि २०२४-२५ दरम्यान उत्कृष्ट निर्यातदारांना त्यांच्या कामगिरीबद्दल १४८ निर्यात उत्कृष्टता पुरस्कार प्रदान केले.

प्लास्टिक उद्योगाने आपले ध्येय उंचावले पाहिजे. पुढील पाच वर्षांत १०० अब्ज अमेरिकन डॉलर्सचा देशांतर्गत बाजार आकार आणि २५ अब्ज अमेरिकन डॉलर्सचा निर्यात उत्पन्न साध्य करण्यासाठी मी या क्षेत्राला काम करण्याचे आवाहन करतो. गुणवत्ता, शाश्वतता, तंत्रज्ञान आणि अधिक जागतिक सहभागासह, भारताचा प्लास्टिक उद्योग हे टप्पे गाठू शकतो आणि गाठेल.असे सुतोवाच गोयल यांनी आपल्या भाषणात केले. पियुष गोयल यांनी प्लास्टिक उद्योगाला भारताच्या राष्ट्रीय शाश्वतता उद्दिष्टांशी आणि वतुर्ळाकार आणि पर्यावरणीयदृष्ट्या जबाबदार उत्पादनांच्या वाढत्या जागतिक मागणीशी सुसंगत राहून प्लास्टिकचा १००% पुनर्वापर आणि पुनर्वापर सुनिश्चित करण्यासाठी निर्णायक झेप घेण्याचे आवाहन केले.

मंत्र्यांनी यावर भर दिला की भारताकडे शाश्वत प्लास्टिक उत्पादनात जागतिक नेता म्हणून उदयास येण्याची क्षमता आणि क्षमता आहे आणि उद्योगांना प्रगत तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण साहित्य आणि जबाबदार उत्पादन पद्धतींमध्ये गुंतवणूक करण्याचे आवाहन केले जे भारताच्या हरित भविष्यासाठी वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतात.

■ ■

## .... असा लागला छत्रीचा शोध



छत्रीचा शोध प्राचीन चीनमध्ये लागला, असे मानले जाते. छत्रीचा शोध ४,००० वर्षांहून अधिक वर्षांपूर्वी लागला आणि सुरुवातीला ती केवळ सूर्यप्रकाशापासून संरक्षण (पॅरासोल) म्हणून वापरली जात होती. छत्रीचा वापर सर्वप्रथम इजिप्त, अश्शूर आणि ग्रीससारख्या प्राचीन संस्कृतींमध्ये दिसून येतो. परंतु, चिनी लोकांनी सर्वप्रथम कागदावर मेण किंवा लाख लावून छत्र्यांना जलरोधक बनवले, ज्यामुळे त्यांचा वापर पावसापासून संरक्षण करण्यासाठी देखील सुरू झाला.

प्राचीन काळात छत्री हे सामाजिक स्थान आणि सत्तेचे प्रतीक होते आणि केवळ उच्चभ्रू किंवा राजघराण्यातील लोकच तिचा वापर करत असत.१८ व्या शतकात, पर्शियन प्रवासी आणि लेखक जोनास हॅनवे यांनी इंग्लंडमध्ये पुरुषांमध्ये छत्रीचा वापर लोकप्रिय केला.१७०५ मध्ये, फ्रेंच व्यापारी जीन मारियस यांनी दुमडता येणारी छत्री शोधली, जी आजच्या आधुनिक छत्रीसारखी होती.१९२८ मध्ये, हॅन्स हॉप्ट यांनी 'पॉकेट' (खिशात मावणारी) छत्री शोधली, ज्यामुळे छत्री अधिक सुटसुटीत झाली.थोडक्यात, छत्रीचा शोध हजारो वर्षांच्या काळात अनेक लोकांनी मिळून विकसित केला आहे, ज्यात चिनी संस्कृतीचे योगदान महत्त्वाचे आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मतदानापूर्वीच गळ्यात पडली नगरसेवक पदाची माळ

■ महासागर प्रतिनिधी, मलकापूर, दि. १८ :
नगरपालिका व नगर पंचायतसाठी नामांकन प्रक्रिया आटोपली. मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल झाले आणि अर्जाची छाननी मंगळवार १८ नोव्हेंबर रोजी आटोपली. मतदान २ डिसेंबरला सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५. ३० वाजे दरम्यान पार पडणार असून, ३ तारखेला सकाळी १० वाजेच्या आसपास मतमोजणी सुरु होऊन निकाल घोषित होणार आहे. परंतु, मतदान होण्यापूर्वीच एका उमेदवाराच्या गळ्यात नगरसेवक पदाची माळ पडली.

हा प्रकार घडला मलकापूर पालिकेच्या प्रभाग १४ अ मध्ये. आज झालेल्या छाननीअंती ही लक्षवेधी अशी राजकीय घडामोड घडली. आंबेडकरी चळवळीतून तयार झालेले भाई अशांत वानखेडे हे प्रभागाचे एकमेव वैध उमेदवार ठरले. त्यांचा बिनविरोध विजय झाला आहे. विरोधी उमेदवाराच्या अर्जसोबत अर्ज एबी फॉर्म नसल्याने छाननीवेळी अपात्र ठरला आणि निकाल स्पष्ट झाला.

छाननी प्रक्रियेसाठी मलकापूर येथील निवडणूक कार्यालयात सकाळपासूनच मोठी गर्दी आणि उत्सुकता होती. मात्र, विरोधी अर्ज बाद झाल्याची घोषणा होताच भाई वानखेडे यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचा जल्लोष उसळला. ढोलझताशे, जल्लोष, फटाके अशा वातावरणात अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला. दरम्यान, मलकापूरसह बुलढाणा जिल्ह्यात सर्वत्र नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीचा माहोल गरम होवू लागला आहे . चिन्ह वाटपानंतर या निवडणुकीत अधिकच रंगत येणार आहे.

## कॅनरा बँकेतून एक कोटीची लूट

■ महासागर प्रतिनिधी भंडारा, दि. १८ :
तुमसर तालुक्यातील गोबरवाही पोलीस ठाण्याअंतर्गत सीतासावंगी येथील कॅनरा बँकेच्या शाखेत काही अज्ञात चोरट्यांनी एक कोटीहून अधिक रकमेची लूट केली.

कॅनरा बँकेचे शाखा व्यवस्थापक गणेश सातपुते (३३) यांच्या तक्रारीवरून गोबरवाही पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सीतासावंगी येथील कॅनरा बँकेच्या शाखेतील चिखला येथून १७ ते १८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी साडेसहा ते सकाळी साडेसात वाजता वाजता दरम्यान सामानासह १ कोटी ५८ लक्ष १२ हजार ९४४ एवढी रक्कम चोरट्यांनी लंपास केली आहे.

चोरट्यांनी बँकेचे कुलूप तोडून ९ सीसीटीव्ही कॅमेरे, डीव्हीआर मशीन, १ मॉनिटरसह स्ट्राँग रूममधून १ कोटी ५८ लक्ष १२ हजार ९४४ रुपये रोख रक्कम चोरून नेली. त्यानंतर चोरट्याने तिथून पळ काढला.

# मित्रपक्षांना संपवणे हाच भाजपचा कार्यक्रम

### बच्चू कडूंचा प्रहार

■ महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. १८ :
सुरूवातीला मित्रपक्षांना सोबत घ्यायचे आणि नंतर घात करून त्यांना संपवणे हाच आजवरचा भाजपचा कार्यक्रम राहिला आहे, अशी टीका माजी राज्यमंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केली आहे.



बच्चू कडू म्हणाले, आतापर्यंत भाजपने जितके मित्रपक्ष तयार केले त्यांना संपवले. जशा प्रकारे वामनाने बळीराजाच्या डोक्यावर पाय ठेवला तसेच भाजप मित्रपक्षांच्या डोक्यावर पाय ठेवतो. मित्र पक्षांचे खच्चीकरण करत मुंबई हातात घेण्याचा प्रयत्न भाजपकडून करण्यात येणार आहे. मित्र पक्षाने जागरूक राहिले पाहिजे. एकवेळ विरोधकांच्या हाती सत्ता गेली तरी चालेल पण भाजप जर असे वागत असेल तर तशाच पद्धतीने उत्तर देणे गरजेचे आहे.

बच्चू कडू म्हणाले, दिव्यांगांचे पगार, लाडक्या बहिणींचे पैसे अजूनही मिळालेले नाहीत. राज्यात कुठलेही आर्थिक संकट नसताना ते दाखवत वेगळे काम करण्याचा प्रयत्न भाजप सरकारकडून सुरू आहे. पैसा नाही म्हणत कंत्राटदारांना पैसे दिले जात नाही. संजय गांधी, लाडकी बहीण, अपंगाचे पैसे तीन-तीन महिने भेटत नाही. दुसरीकडे त्यांच्यात निकटचे जे कंत्राटदार आहेत त्यांचे देयके निघत आहेत. भाजपकडून अर्थकारण सुरू आहे. ह्यआरएसएसह्णच्या विचारसरणीच्या लोकांना फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**निवडणूक म्हणजे धार्मिक युद्ध**

बच्चू कडू म्हणाले, निवडणूक ही आता मुद्द्याची राहिलेली नाही ते एक मोठे धार्मिक युद्ध झाले आहे. प्रभागामध्ये देखील जाती-जातींमध्ये हे युद्ध सुरू झाले आहे. लोकशाहीमध्ये होणारे मतदान हे विकास आणि मुद्द्यापासून दूर गेलेले आहे, हे देशासाठी घातक आहे. चांगल्या कार्यकर्त्यांची १० टक्के लोक कदर करतात ९० टक्के लोक तसे करत नाही. पैसा खर्च करणाऱ्यांचा मागे लोक जात आहेत, असे चित्र दिसून येत आहे.

बच्चू कडू म्हणाले, ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे म्हणत कार्यकर्त्यांना भावनिक करायचे आणि राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांना उमेदवारी द्यायची असे प्रकार केले जातात. पक्षाचे गुलाम असणाऱ्या लोकांमध्ये वैचारिक बांधिलकी राहिलेली नाही. ते फक्त पक्ष म्हणून काम करतात मग त्यांनी कोणीही उमेदवार दिला तर त्यांचे गुणगाण गातात. नवरा आमदार असतो आणि तो बायकोला नगराध्यक्ष करण्यासाठी प्रयत्न करतो, ही चुकीची गोष्ट आहे. जर तिचे कर्तृत्व असेल तर वेगळी गोष्ट आहे, पण फक्त घराणेशाही म्हणून हे अत्यंत चुकीचे आहे.